रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक २५५
www.ramprahar.com

◆ शुक्रवार, ३ एप्रिल २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## राज्यातील अवकाळीग्रस्त शेतकऱ्यांना सरकार मदत देणार



**पुणे :** राज्यात वादळी वारा व गारांच्या पावसामुळे (अवकाळी) एक लाख २२ हजार हेक्टरहून (तीन लाख पाच हजार एकर) अधिक क्षेत्रावरील शेती पिकांचे नुकसान झाले आहे. राज्यभरातील नुकसानीची माहिती संबंधित अधिकाऱ्यांकडून घेऊन तातडीने पंचनामे पूर्ण करून बाधित शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत दिली जाईल, अशी माहिती राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. त्यांनी गुरुवारी (दि.२) भोर तालुक्यातील वडगाव डाळ येथे भेट देऊन नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली आहे. या दौऱ्यादरम्यान त्यांनी नुकसान झालेल्या आंब्याच्या बागांचे तसेच विविध शेती पिकांची प्रत्यक्ष पाहणी केली. अवकाळी पावसामुळे अनेक ठिकाणी फळगळ, झाडांचे नुकसान तसेच उभ्या पिकांवर परिणाम झाल्याचे दिसून आले. यावेळी कृषीमंत्री भरणे यांनी शेतकऱ्यांशी थेट संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.

## अंतरंग

श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावरील टपऱ्या वनखात्याने हटवल्या/२
रायगडात पेट्रोल-डिझेलच्या खुल्या विक्रीवर बंदी/५
कोनेक्स प्रीमियर लीगमध्ये रेड चॅलेंजर्स संघ विजेता/८

# लोकनेते रामशेठ ठाकूर सेवासम्राट!

### मंत्री आशिष शेलार यांचे गौरवोद्गार

### उलवे नोड येथील महोत्सवाचा शानदार समारोप



**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हृदयातून वाहणारा सेवेचा झरा कधीच आटत नाही. आकडे आणि रकमा त्यांच्या कार्यापुढे तोकड्या पडतात. इथून पुढे संपूर्ण महाराष्ट्रात रामशेठ यांची ओळख सेवासम्राट म्हणूनच होईल, असे गौरवोद्गार राज्याचे सांस्कृतिकमंत्री आशिष शेलार यांनी उलवे नोड येथे काढले.

दानशूर व्यक्तिमत्व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त भाजप पुरस्कृत श्री गणेश सामाजिक मंडळ, गव्हाण यांच्या वतीने आयोजित उलवे नोड सी-फूड फेस्टिवल आणि आगरी-कोळी महोत्सव उत्साहात झाला. उलवे येथील रामशेठ ठाकूर मैदानावर २९ मार्च ते १ एप्रिल या कालावधीत रंगलेल्या या महोत्सवाची सांगता बुधवारी मंत्री आशिष शेलार यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली. त्यावेळी त्यांनी येणाऱ्या वर्षभरात आगरी-कोळी संस्कृतीचा हा ठेवा कार्यक्रमांच्या माध्यमातून महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यापर्यंत पोहचवला जाईल, अशी घोषणा केली.

आपल्या भाषणात मंत्री शेलार म्हणाले की, मला सर्वात आवडलेलं लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या भाषणातील एक वाक्य आहे, ते म्हणजे आम्हाला आंदोलनाची सवयच आहे. तुमचा जसा आंदोलनाचा पिंड आहे तोच आमचाही आहे, पण मंत्री झाल्यापासून जरा त्या भूमिकेला आवर घालावा लागतोय, मात्र तुम्हाला आंदोलन न करू देता पुढच्या वेळी या महोत्सवाला येईन त्याच्या आधी तुमच्या संपूर्ण मागण्या मान्य झालेल्या असतील,' अशी ग्वाही ना. शेलार यांनी दिली. जनतेसाठी सदैव तत्पर राहणारे लोकप्रतिनिधी म्हणून आमदार महेश बालदी यांच्या कार्याचेही त्यांनी विशेष कौतुक केले.

यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सांगितले की, उलवे नोडमध्ये शिवसृष्टी उभी राहावी अशी भूमिपुत्रांची मागणी आहे, मात्र सिडकोचे अधिकारी इतके मुजोर बनले आहेत की, कवडीमोल भावाने आमच्याकडून घेतलेली जागा छत्रपती शिवरायांच्या पुतळ्यासाठी एकरी पाच कोटी रुपयांनी मागतात, हे दुर्दैवी आहे. **(पान २ वर..)**

### पनवेल महापालिकेचा महाराष्ट्रात प्रथमच प्रयोग

# 'स्मार्ट पे किऑस्क'द्वारे मालमत्ता कर भरण्याची सुविधा

■ आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नागरिकाभिमुख डिजिटल सेवांच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल टाकत पनवेल महापालिकेने स्मार्ट पे किऑस्क सिस्टीम या अत्याधुनिक स्व-सेवा सुविधेचा शुभारंभ केला आहे. या स्मार्ट किऑस्क मशीनचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते गुरुवारी (दि.२) आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत नाट्यगृह येथे करण्यात आले. ही अत्याधुनिक डिजिटल सेवा सुरू करणारी पनवेल ही महाराष्ट्रातील पहिली महापालिका ठरली आहे.

या कार्यक्रमास महापौर नितीन पाटील, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, महिला बालकल्याण सभापती ममता म्हात्रे, महापालिका सदस्य, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त स्वरूप खारगे, बँक ऑफ महाराष्ट्रचे अधिकारी, महापालिका अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या स्मार्ट पे किऑस्क सिस्टीममुळे पनवेलमधील नागरिकांना मालमत्ता कर भरण्याची प्रक्रिया अधिक सुलभ, जलद आणि पारदर्शक झाली आहे. नागरिक आता केवळ बिल स्कॅन करून काही क्षणांत कर भरू शकतात तसेच मालमत्ता उतारा, थकबाकी नसल्याचा दाखला, अर्ज नोंदणी यांसारख्या विविध नागरी सेवा देखील या किऑस्कच्या माध्यमातून सहज उपलब्ध होणार आहेत.

> **पनवेल शहर झपाट्याने विकसित होत असून नागरिकांना आधुनिक व दर्जेदार सुविधा देणे ही काळाची गरज आहे. स्मार्ट पे किऑस्क सिस्टीम ही त्या दिशेने एक महत्त्वाची पायरी आहे.**
> **-आमदार प्रशांत ठाकूर**

या प्रणालीमध्ये टॅप अॅड पे यासारख्या डिजिटल पेमेंट पर्यायांचा समावेश असून व्यवहारानंतर त्वरित पावती मिळते. त्यामुळे नागरिकांना रांगेत उभे राहण्याची गरज भासत नाही आणि वेळेची मोठ्या प्रमाणात बचत होते. पनवेल महापालिकेच्या मालमत्ता कर विभागाने सेवांचे आधुनिकीकरण करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबवला असून भविष्यात व्हॉइस इंटरॅक्शनसारख्या तंत्रज्ञानाचाही समावेश करण्यात येणार आहे. त्यामुळे नागरिक किऑस्कशी थेट संवाद साधून विविध सेवा सहज मिळवू शकतील.

अत्याधुनिक स्मार्ट पे किऑस्क मशीन ही मालमत्ता कर विभागाचे उपायुक्त स्वरूप खारगे यांच्या पुढाकाराने व स्थापत्य कन्सल्टंट या संस्थेमार्फत विकसित करण्यात आली असून खास करून स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी विशेष तंत्रज्ञानाधारित, पारदर्शक आणि अधिक कार्यक्षम सेवा प्रणाली निर्माण करण्याच्या दृष्टीने हा एक महत्त्वपूर्ण टप्पा मानला जात आहे. **(पान २ वर..)**

**महापालिकेच्या अत्याधुनिक वाहनांचे लोकार्पण** (वृत्त पान ३ वर..)

## राज्यात अवकाळी पाऊसधारा

### पुण्यात पाणी साचले; झाड कोसळून महिलेचा मृत्यू



**पुणे : प्रतिनिधी**

राज्याच्या बहुतांश भागात अवकाळी पावसाने पुन्हा गुरुवारी (दि. २) हजेरी लावली. पुणे शहर आणि परिसराला तर वरुणराजाने झोडपून काढले. या पावसाचा जोर इतका होता की पाणी साचून जनजीवन विस्कळीत झाले. यादरम्यान सिंहगड रोड येथे झाड कोसळून रंजना नवनाथ गिरी या महिलेचा मृत्यू झाला, तर दोघांना वाचवण्यात पोलिसांना यश आले.

पुण्यात दुपारी दोन वाजल्यानंतर वातावरणात बदल होण्यास सुरुवात झाली. आकाश ढगांनी व्यापले आणि अंधारून आले. पुणे शहरासह पिंपरी चिंचवडमध्ये ढगांचा कडकडाट, विजांचा कडकडाट आणि सोसाट्याच्या वाऱ्यासह पाऊस पडला. शहरातील मध्यवर्ती पेठ, कात्रज, औंध, बाणेर, बिबवेवाडी, कोथरूड, शिवाजीनगर, उंड्री अशा बहुतांश ठिकाणी जोरदार पावसाची नोंद झाली.

पावसामुळे रस्त्यांवर ओढ्यासारखे पाणी वाहू लागले. सखल भागांमध्ये पाणी साचले. या पावसामुळे नागरिकांची त्रेधातिरपिट उडाली तसेच वाहनचालकांनाही त्रास सहन करावा लागला. दरम्यान, आणखी काही दिवस अवकाळी पावसाचा अंदाज हवामान खात्याने वर्तविला आहे.

### रायगडातही सरी

**माणगाव, खालापूर : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातही गुरुवारी (दि. २) सकाळपासूनच वातावरणात दमटपणा आणि आकाशात मळभ निर्माण झाल्याने पावसाची शक्यता होती. अखेर दुपारी काही भागांमध्ये पावसाच्या सरी बसरल्या, तर काही ठिकाणी शिडकावा झाला.

दक्षिण रायगडातील माणगाव, महाड, पोलादपूरसह कर्जत, खालापूर आदी उत्तर भागातही पाऊस पडला. त्यामुळे तापमानात थोडीशी घट झाली आहे. दरम्यान, या अवकाळी पावसाचा परिणाम शेतीवर होण्याची भीती व्यक्त होत आहे. विशेषतः कडधान्य शेती तसेच आंबा पिकाचे नुकसान होण्याची शक्यता असल्याने बळीराजा चिंतेत आहे.

## भोंदू अशोक खरातला सात दिवसांची पोलीस कोठडी



**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिकमधील लैंगिक शोषण प्रकरणातील आरोपी भोंदू अशोक खरात याची गुरुवारी (दि.२) व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे नाशिक जिल्हा सत्र न्यायालयात सुनावणी पार पडली. आता न्यायालयाने त्याला ८ एप्रिलपर्यंत सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

एसआयटीने खरातला सुरक्षेच्या कारणाने व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे हजर केले होते. खरातच्या दुसऱ्या एका गुन्ह्यासंदर्भात ही सुनावणी होती. पहिल्या गुन्ह्यात त्याला न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आलेली आहे.

सुनावणीदरम्यान खरात प्रकरणातील तपास अधिकारी किरण कुमार सूर्यवंशी तसेच सरकारी वकील अॅड. शैलेंद्र बागडे यांनी युक्तिवाद केला. सरकारी वकिलांनी खरातची सात दिवसांची पोलीस कोठडी मागितली, तर खरातच्या वकिलाने आता पुन्हा एवढ्या दिवसांच्या पोलीस कोठडीची आवश्यकता का आहे? असे म्हटले, मात्र न्यायालयाने चौकशीसाठी सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावली.

### पत्नीविरुद्ध लुकआऊट नोटीस जारी

**अहिल्यानगर :** शेकडो महिलांचे लैंगिक शोषण केल्याप्रकरणी अटकेत असलेल्या भोंदूबाबा अशोक खरातवर एका मागोमाग एक गुन्हे दाखल होत आहेत. खरात हा सावकारकीचाही धंदा करायचा व त्यामध्ये त्याची पत्नी कल्पना खरात भागीदार होती. त्यामुळे तिच्याविरुद्धदेखील गुन्हा दाखल करण्यात आला आहे, मात्र गुन्हा दाखल होताच कल्पनाने धूम ठोकली. आता तिच्याविरोधात शिर्डी पोलिसांकडून लुकआऊट नोटीस जारी करण्यात आली. त्यामुळे ती परदेशात पळून जाण्याचा मार्ग बंद झाला आहे.

## सभापती रंजना वास्कर यांचा सेवाभावी वाढदिवस

### वृद्धाश्रमांमध्ये फळांचे वाटप; रस्त्याचे लोकार्पण





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल पंचायत समितीच्या सभापती रंजना वास्कर यांचा वाढदिवस गुरुवारी (दि.२) उत्साहात आणि सामाजिक बांधिलकी जपत साजरा करण्यात आला. राजकीय झगमगाटापेक्षा समाजसेवेला प्राधान्य देत या वाढदिवसाचे औचित्य साधून तालुक्यातील करुणेश्वर आणि वात्सल्य या वृद्धाश्रमांमध्ये फळांचे वाटप करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ नागरिकांसोबत संवाद साधून त्यांचा आशीर्वाद घेत सभापतींनी आपला वाढदिवस सार्थकी लावला.

या सोहळ्याचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या स्थानिक विकासनिधीतून वात्सल्य आश्रमाकडे जाणाऱ्या रस्त्याचे लोकार्पण करण्यात आले. या नवीन रस्त्याचे उद्घाटन सभापती रंजना वास्कर यांच्या हस्ते झाले, ज्यामुळे आश्रमातील रहिवासी आणि परिसरातील नागरिकांची मोठी सोय झाली आहे.

यावेळी भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, पं.स.चे उपसभापती भूपेंद्र पाटील, माजी जि.प. सदस्य अमित जाधव, माजी सरपंच सदाशिव वास्कर, **(पान २ वर..)**

## सभागृहात गोंधळ घालण्याचा डाव उधळला!

### पाणी नियोजनासंदर्भात जल परिषद घेणार -महापौर नितीन पाटील

### लघुकाळासोबतच दीर्घकालीन उपाययोजनांवर दिला जाणार भर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सभागृहात नगरसेवक-नगरसेविकांना आपले विषय मांडण्याचा आणि चर्चेत सहभागी होण्याचा अधिकार असतो, मात्र पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात बुधवारी झालेल्या महापालिकेच्या महासभेत विरोधी पक्षाने स्वतः बोलण्याऐवजी कुटील रणनीती आखून प्रेक्षक गॅलरीत नागरिकांना फलकासह बसवले होते. विशेष म्हणजे या सर्व नागरिकांसाठी विशेष बसची व्यवस्था करण्यात आली होती. विरोधी पक्षाने आपली निष्क्रियता झाकून टाकण्यासाठी नागरिकांना आणल्याचीही चर्चा यावेळी रंगली.

प्रेक्षक गॅलरीतून गोंधळ होण्याची शक्यता लक्षात आल्याने महापौर नितीन पाटील यांनी तत्काळ सभागृहाच्या कामकाजाला छेद घालण्याच्या आणि हीन राजकारणाबद्दल विरोधकांवर ताशेरे ओढले. सभागृहात शिस्तबद्ध योग्य प्रकारे कामकाज होणे अपेक्षित आहे. या ठिकाणी लोकप्रतिनिधींना आपले म्हणणे मांडण्याचा अधिकार असतो. त्यामुळे नागरिकांनी आपले काही म्हणणे असेल, तर महापालिका प्रशासन कार्यालयात निवेदन द्यावे. ही महासभा असल्याने फलक दाखवणे, निदर्शने करणे, घोषणाबाजी करणे संयुक्तिक नाही; अन्यथा कारवाई करण्यात येईल असे निर्देश दिले. त्यामुळे विरोधकांकडून आलेल्या नागरिकांनी हळहळू प्रेक्षक गॅलरीतून पाय काढला.

तीन वर्षांच्या प्रशासकीय कालावधीनंतर झालेल्या या महासभेत नागरिकांच्या प्रश्नांना न्याय देण्याच्या भूमिकेतून वाटचाल करण्याची गरज असताना विरोधी पक्षाकडून पाणी प्रश्नाचे स्वार्थी राजकारण करण्यात आले. महासभेत गोंधळ घालण्याचा हा कुटील डाव महापौर नितीन पाटील यांनी उधळून लावला. त्याचबरोबर पाणी प्रश्न हा आमच्या जिव्हाळ्याचा आहे, त्यासाठी योग्य त्या उपाययोजना करण्याचे निर्देश त्यांनी प्रशासनाला देऊन येत्या पंधरा दिवसात विशेष सभेतून पाणी परिषद घेणार असल्याचे त्यांनी जाहीर केले तसेच पाणीपुरवठा योग्य होईपर्यंत बिल्डरांचे पाणी कनेक्शन बंद करण्याच्याही सूचना त्यांनी यावेळी प्रशासनाला केली.

महापौर नितीन पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेला उपमहापौर प्रमिला पाटील, आयुक्त मंगेश चितळे, अतिरिक्त आयुक्त गणेश शेट्ये, नगरविकास सचिव, सभागृह नेते अॅड. प्रकाश बिनेदार, विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, महिला व बालकल्याण सभापती ममता म्हात्रे, नगरसेवक, नगरसेविका, अधिकारी उपस्थित होते. दरम्यान, अर्धा तास चर्चेत पाणी प्रश्नावर चर्चा झाली. **(पान २ वर..)**

## विचुंबे येथे उद्या जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा रंगणार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दानशूर व्यक्तिमत्व, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त तसेच विचुंबे ग्रामपंचायतीचे सरपंच प्रमोद भिंगारकर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून शनिवारी (दि.४) रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने भव्य जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

विचुंबे येथील विठ्ठल-रखुमाई मैदानात सायंकाळी ४ वाजता ही स्पर्धा सुरू होणार असून यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजप महाराष्ट्र प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, महापौर नितीन पाटील, जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, पनवेल पंचायत समितीच्या सभापती रंजना वास्कर, नगरसेवक परेश ठाकूर, पंचायत समितीचे उपसभापती भूपेंद्र पाटील यांच्यासह अनेक स्थानिक लोकप्रतिनिधी व पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.



पामबीच मार्गावरून सायन-पनवेल महामार्गावर जाण्याकरिता

# आर्म उड्डाणपुलाचे लोकार्पण

**नवी मुंबई : बातमीदार**

महापालिकेच्या वतीने वाशी से.१७ येथे पामबीच मार्गावरुन पुण्याकडे जाण्याकरिता सायन-पनवेल महामार्गापर्यंत उड्डाणपूल आर्मचे लोकार्पण समारंभ राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते संपन्न झाले.



याप्रसंगी नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील, उपमहापौर दशरथ भगत, ड प्रभाग समितीचे सभापती प्रकाश मोरे, आरोग्य समिती सभापती डॉ जयाजी नाथ, पाणीपुरवठा व मलनिःस्सारण समिती सभापती श्री.रविकांत पाटील, क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रम समिती सभापती श्री.गिरीश म्हात्रे, नगरसेवक शशिकांत राऊत, शशिकांत भोईर, सुरज पाटील, निशांत भगत, संदिप म्हात्रे,भरत नखाते, उपआयुक्त सोमनाथ पोटरे, सहा.आयुक्त तथा विभाग अधिकारी सुखदेव येडवे व सागर मोरे आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी प्रसार माध्यमांशी बोलतांना वनमंत्री गणेश नाईक यांनी नवी मुंबईतून पामबीच रस्त्यावरुन पुण्याकडे जाण्यासाठी बनविण्यात आलेला जोडरस्ता हा अत्यंत उपयोगी असल्याचे सांगत ही कल्पना ज्यांना सूचली व ज्यांनी अंमलात आणली त्या घटकांचे कौतुक केले. नवी मुंबई शहराच्या रचनेमधील त्रुटी दूर करणारा हा प्रकल्प असल्याचे सांगत शहर अंतर्बाह्य सुंदर दिसण्यासाठी यापुढील काळात काम केले जाईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी आर्म उड्डाणपूलावरून पहिला प्रवास दिव्यांग व्यक्तींसाठी असलेल्या दुचाकी वाहनाव्दारे वैभव ठाकूर यांनी केला. मंत्र्यांच्या हस्ते त्यांना पुष्पगुच्छ देऊन सन्मानीत करण्यात आले. याप्रसंगी शहर अभियंता.शिरीष आरदवाड यांच्या नियंत्रणाखाली कार्यरत आर्म उड्डाणपूल बांधकामाशी संबधीत कार्यकारी अभियंता पंढरीनाथ चौडे, उपअभियंता अमित पावरा, कनिष्ठ अभियंता रोहित पिंपळे तसेच वास्तुविशारद व कंत्राटदार यांच्या प्रतिनिधींचाही सन्मान करण्यात आला.


पामबीच मार्गावरुन सायन पनवेल महामार्ग पर्यंत जाण्यासाठी से.१७, वाशी येथे १८ कोटी ३२ लक्ष रक्कम खर्च करुन २९० मी. लांबीचा व ६.५० मी. रुंदीचा आर्म उड्डाणपूल बांधण्यात आला असून यामुळे वाशी पामबीच सिटी बँक जवळील चौकातून थेट सायन पनवेल महामार्गावर जाणे सोपे होणार आहे. सध्या पामबीच मार्गावरुन सायन पनवेल महामार्गावर जाण्यासाठी सानपाडा येथून मोठा वळसा घालून जावे लागत असून या आर्म उड्डाणपूलामुळे नागरिकांचा १० ते १५ मिनिटांचा वेळ वाचून इंधनाचीही बचत होणार आहे.

# रायगडात २५४९ क्षयरुग्ण

## जानेवारी ते मार्च तीन महिन्यांत ८७९ नवे रुग्ण आढळले

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यात एकूण २ हजार ५४९ क्षयरुग्णांवर उपचार सुरु असून, यापैकी ८७९ क्षयरुग्ण हे जानेवारी ते मार्च या तीन महिन्यात आढळून आले आहेत.



आरोग्य विभागाच्या माहितीनुसार, गेल्या काही महिन्यांत क्षयरुग्ण शोध मोहिमेला वेग देण्यात आला आहे. त्यातून नव्याने आढळणाऱ्या रुग्णांची संख्या चिंताजनक आहे. जिल्ह्यातील ग्रामीण तसेच दुर्गम भागात अद्यापही क्षयरोगाबाबत जागरूकतेचा अभाव असल्याचे दिसून येते.

मागील तीन महिन्यात ८७९ क्षयरुग्ण सापडल्याने संसर्गाचा वेग अद्याप कमी झालेला नसल्याचे स्पष्ट होते. काही रुग्णांकडून उपचार अपूर्ण ठेवले जाणे, वेळेवर तपासणी न होणे आणि सामाजिक भीती यामुळेही परिस्थिती गंभीर बनत आहे.

दरम्यान, आरोग्य विभागाने नागरिकांना आवाहन केले आहे की, दोन आठवड्यांपेक्षा जास्त काळ खोकला, वजन घटणे किंवा ताप अशी लक्षणे आढळल्यास त्वरित जवळच्या आरोग्य केंद्रात तपासणी करावी. क्षयरोग पूर्णपणे बरा होणारा असून, नियमित आणि पूर्ण उपचार घेणे अत्यंत आवश्यक आहे.

क्षयरोग मुक्तीसाठी जिल्ह्यात १०० दिवसांचे विशेष अभियान राबविण्यात येत आहे. या मोहिमे अंतर्गत घरोघरी जाऊन संशयित रुग्णांची तपासणी करणे तसेच सापडलेल्या रुग्णाने औषधोपचार अर्धवट सोडू नये याची विशेष काळजी घेण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे शाळा, महाविद्यालये आणि सार्वजनिक ठिकाणी जनजागृती करणे व आवश्यक दुर्गम भागात तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती आरोग्य विभागाने दिली.

**क्षयरोगाचे समूळ उच्चाटन करण्यासाठी जिल्हा आरोग्य प्रशासन सातत्याने प्रयत्न करीत आहेत. जिल्ह्यातील ४४५ ग्रामपंचायती क्षयरोगमुक्त झाल्या आहेत. नागरिकांनी क्षयरोगाची लक्षणे दिसल्यास त्वरीत शासकीय रुग्णालयात तपासणी करून घ्या.**
**-डॉ. प्राची नेहुलकर,**
जिल्हा आरोग्य अधिकारी,
रायगड जिल्हा परिषद

# वेताळ देवस्थान विटंबनेप्रकरणी लव्हेज ग्रामस्थ आक्रमक

**खोपोली : प्रतिनिधी**

नगरपालिका हद्दीतील लव्हेज गावाच्या हद्दीतील स्टील कारखान्याच्या आवारात असलेल्या वेताळ देवस्थानचे जमीन सपाटीकरण करताना ठेकेदारने मूर्तीची विटंबना केल्याच्या पार्श्वभूमीवर ग्रामस्थ आक्रमक झाले असून, पालिका प्रशासन त्याचप्रमाणे, पोलीस विभागाने संबंधितांवर कडक कारवाई करण्यात यावी यासाठी निवेदन दिली आहेत, कारवाई न झाल्यास ग्रामस्थांतर्फे उपोषण आंदोलन यासारखे तीव्र स्वरूपाचे आंदोलन करावे लागेल असा इशारा यावेळी ग्रामस्थांच्या वतीने देण्यात आला आहे.



दरम्यान ग्रामस्थांनी या संदर्भात नगराध्यक्ष फुलदीपक शेंडे व मुख्याधिकारी डॉक्टर पंकज पाटील व पोलीस निरीक्षक सचिन हिरे यांना निवेदनाद्वारे आपल्या व्यथा सांगितले असून याबाबत प्रशासनाने तातडीने संबंधितांवर कारवाई करण्यात यावी अशी विनंती केली आहे.

लव्हेज व वासरंग या दोन्ही गावाच्या मध्ये स्टील कारखाना असून या स्टील कारखान्याच्या अतिरिक्त जागेत सपाटीकरण सुरू असून त्या ठिकाणी वेताळाचे देवस्थान होते व याबाबत ग्रामस्थांनी कारखाना व्यवस्थापनाला व संबंधित ठेकेदारालाही याची कल्पना दिली असतानाही ठेकेदाराने त्या वेताळ देवस्थानाचे विटंबना करून मूर्ती हलवल्याप्रसंगी ग्रामस्थांनी तीव्र शब्दात या घटनेचा निषेध व्यक्त केला असून संबंधित ठेकेदारावर भावना दुखावल्याच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने व पोलिसाने कडक कारवाई करण्यात यावी अशा स्वरूपाचे निवेदन दिले

दरम्यान या चर्चेच्या वेळी कारखान्याच्या अतिरिक्त जागेमध्ये नैसर्गिक पाण्याचा तलाव होता तो कारखाना व्यवस्थापनाने भूजविला असून तो तलाव पुनर्जीवित करण्यात यावा जेणेकरून या भागातील पाण्याचे समस्या दूर होईल असा चर्चेदरम्यान ग्रामस्थांनी नगराध्यक्ष यांना सांगितले. पाण्याचा तलाव बुजवल्याच्या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांनी तहसीलदार यांनाही निवेदन देणार असल्याचे यावेळी सांगितले आहे. येत्या आठ दिवसात याबाबत योग्य तो निकाल मिळाला नाही तर ग्रामस्थ तीव्र स्वरूपाचे आंदोलन करणार असल्याचे ग्रामस्थांतर्फे कळविले आहे.

# अमृत परिवार सर्वेक्षण अभियान


**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) या स्वायत्त संस्थेमार्फत खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांपर्यंत विविध योजनांचा लाभ पोहोचविण्यासाठी 'अमृत परिवार सर्वेक्षण अभियान' राबविण्यात येणार आहे. हे अभियान ८ एप्रिल ते २५ एप्रिल २०२६ या कालावधीत जिल्ह्यात आयोजित करण्यात येणार आहे.

अमृत संस्थेच्या माध्यमातून अशा जाती-जमातींना लाभ दिला जातो, ज्यांना इतर कोणत्याही संस्था किंवा महामंडळांच्या योजनांचा लाभ मिळत नाही. सध्या ब्राह्मण, सिंधी, हिंदू मारवाडी, गुजराती, पटेल, राजपूत, राजपुरोहित, हिंदू नेपाळी, बनिया, कम्मा, कायस्थ, अय्यंगार, नायर, नायडू, पाटीदार, बंगाली, भूमिहार, येलमार, ठाकूर, त्यागी, सेनगूनथर, जाट, कानबी, कोमटी/वैश्य आदी जातींचा अमृतच्या लक्षित गटात समावेश आहे.

या सर्वेक्षण मोहिमेदरम्यान अमृत संस्थेचे प्रतिनिधी संबंधित कुटुंबांशी थेट संपर्क साधून त्यांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीची माहिती संकलित करणार आहेत. तसेच विविध सामाजिक संस्था, संघटना आणि मंडळांकडूनही माहिती घेतली जाणार आहे.अमृतच्या योजनांमध्ये विद्यार्थी, तरुण, महिला, व्यावसायिक आणि शेतकरी अशा कुटुंबातील प्रत्येक घटकासाठी विविध उपक्रमांचा समावेश अभियानाचा उद्देश आहे.

# श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावरील टपऱ्या वनखात्याने हटविल्या



**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन नगर परिषदेची पहिलीच जनरल सभा प्रचंड वादळी ठरली होती. या सभेमध्ये श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्या वरती अनधिकृत असलेल्या टपऱ्यांबाबत सर्वांनीच आवाज उठविला होता. यावेळी सभेत झालेल्या निर्णयानुसार वनखात्याकडे सदरच्या अनधिकृत टपऱ्या हटवण्याबाबत वार्तालाप करण्यात आला होता. दुसऱ्याच दिवशी वन खात्याने सर्व टपरीधारकांना नोटीस बजावून आपण त्या ठिकाणी ठेवलेल्या टपऱ्या खाली कराव्यात अन्यथा त्या हटविल्या जातील. अशा प्रकारे कळविले होते.

यानुसार श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावरील सर्व टपरीधारकांनी आपल्या हातगाड्या, टेबल, खुर्च्या त्या ठिकाणाहून हटवून श्रीवर्धन समुद्रकिनारा मोकळा करून दिला आहे. शासकीय विश्रामगृहाच्या किनाऱ्याजवळ स्मशानभूमी आहे. या ठिकाणी टपरी वरती गिऱ्हाईक बसलेले असताना नागरिकांना प्रेत घेऊन जाण्यासाठी मोठ्या प्रमाणावर अडचण निर्माण होत होती. याबाबत श्रीवर्धन नगरपरिषदेत सर्वपक्षीय नगरसेवकांनी आवाज उठवल्यानंतर ही कारवाई करण्यात आली आहे. सदर टपऱ्या हटवल्यामुळे श्रीवर्धन मधील नागरिकांनी व येणाऱ्या पर्यटकांनी देखील समाधान व्यक्त केले आहे.

श्रीवर्धन समुद्र किनाऱ्यावर असलेली जागा वनखात्याच्या अखत्यारीत येत असल्याने वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी टपऱ्या हटविण्यासाठीमहत्वाची भूमिका बजावली आहे. त्यासाठी वनखात्याचे नागरिक कौतुक करत आहेत.

पान १ वरुन

## लोकनेते रामशेठ ठाकूर सेवासम्राट!

महाराजांची शिवसृष्टी इथे उभी राहावी यासाठी गेली अनेक वर्ष आम्ही सिडकोसोबत संघर्ष करतोय. आमचे दोन्ही आमदार सिडकोच्या विरोधात विधीमंडळात आवाज उठवत आहेत. राज्यातील भाजप महायुतीच्या सरकारवर आमचा विश्वास आहे म्हणून, नाही तर सिडकोविरोधात आम्ही मोठे आंदोलन उभे केले असते. तसे आंदोलन आम्ही यापूर्वी वेळोवेळी उभे केले आहे

सिडकोने ही जागा ग्रामपंचायतीच्या ताब्यात द्यावी, आम्ही तिथे छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा आणि शिवसृष्टी उभी करू, अशी मागणी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी मंत्री आशिष शेलार यांच्याकडे केली, तर आमदार महेश बालदी यांनीही आगरी-कोळी समाजाची संस्कृती रूजवण्यासाठी अशा महोत्सवांना शासनाकडून पाठबळ मिळावे, अशी मागणी केली.

या महोत्सवामध्ये पनवेलमधील सुप्रसिद्ध डॉ. गिरीश गुणे आणि कीर्तनकार निवृत्तीबुवा चौधरी यांचा सत्कार करण्यात आला. समारोप सोहळ्यास भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, वाय.टी. देशमुख, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, जिल्हा परिषद सदस्य निकिता खारकर, प्राची जाधव, सोनाली जितेकर, पंचायत समिती सदस्य जिज्ञासा कोळी, वितेश म्हात्रे, महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, ग्रामपंचायत सदस्य सागर ठाकूर, रतनशेठ भगत, सचिन घरत, हेमंत पाटील, निलेश खारकर, धीरज ओवळेकर, साईचरण म्हात्रे, सुहास गोंधळी, प्रतीष पाटील, अमित नाईक, प्रणय कोळी, राहुल घरत, अमोघ ठाकूर, अपूर्व ठाकूर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक आणि आगरी-कोळी बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या चार दिवसीय महोत्सवात परिसरातील नागरिकांना आगरी-कोळी समाजाच्या समृद्ध खाद्यसंस्कृतीचा, परंपरांचा आणि जीवनशैलीचा अनोखा अनुभव घेता आला. विविध पारंपरिक सी-फूड पदार्थांची चव आणि स्थानिक कलावंतांच्या सादरीकरणामुळे या महोत्सवात मोठी रंगत आली होती.

## 'स्मार्ट पे किऑस्क'द्वारे मालमत्ता कर भरण्याची सुविधा

या मशीनसाठी येणारा सर्व खर्च बँक ऑफ महाराष्ट्रकडून करण्यात येणार असून यासाठी पनवेल महापालिकेचा एकही रुपया खर्च होणार नाही. स्मार्ट पे कियॉस्क हे मुख्यालय व प्रभाग कार्यालयात बसवले जाणार आहे.

स्थायी समिती अध्यक्ष बबन मुकादम यांच्या हस्ते किऑस्कद्वारे पहिला मालमत्ता कर भरणा करण्यात आला. यावेळी त्यांनी महापालिकेने सुरू केलेल्या अत्यंत सुलभ अशा अत्याधुनिक उपक्रमाची प्रशंसा करून या उपक्रमाची औपचारिक सुरुवात झाली.

दरम्यान, विकास, नवकल्पना आणि पारदर्शकतेच्या या प्रवासात नागरिकांचा सहभाग आणि सहकार्य महत्त्वाचे असून या नव्या उपक्रमामुळे शहराच्या स्मार्ट विकासाला निश्चितच गती मिळणार आहे. नागरिकाभिमुख आणि तंत्रज्ञानाधारित सेवा देण्याचा निर्धार प्रशासनाने केला असून या उपक्रमामुळे शहराच्या स्मार्ट विकासाला निश्चितच गती मिळणार आहे, असा विश्वास आयुक्त मंगेश चितळे यांनी व्यक्त केला आहे.

## सभापती रंजना वास्कर यांचा सेवाभावी वाढदिवस

शांताराम पोपेटा, यतीन पाटील, रमेश पाटील, सुनील पाटील, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, तालुका सरचिटणीस विश्वजीत पाटील, नवीन पनवेल अध्यक्ष मयुर कदम यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. सभापती रंजना वास्कर यांनी राबवलेल्या या विधायक उपक्रमाचे कौतुक होत असून अनके मान्यवरांनी त्यांची भेट घेऊन त्यांना वाढदिसावाच्या शुभेच्छा दिल्या.

## सभागृहात गोंधळ घालण्याचा डाव उधळला!

नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, विकास घरत, ॲड. मनोज भुजबळ, प्रवीण पाटील, रामदास शेवाळे, अजय बहिरा, अमर पाटील, विजय खानावकर, लतीफ शेख व इतर नगरसेवकांनी या चर्चेत सहभाग घेतला. त्यांनी आपापल्या भागातील पाण्याची स्थिती मांडतानाच उपाययोजनासंदर्भात चर्चा केली. डॉ. अरुणकुमार भगत यांनी, पनवेलच्या पाणीपुरवठ्याबाबत आमदार प्रशांत ठाकूर यांनी न्हावाशेवा टप्पा ३ योजनेचा सातत्याने पाठपुरावा केल्याचे नमूद करून दरमहा त्याचा आढावा ते घेत असल्याचे स्पष्ट केले.

सभागृहनेते ॲड. प्रकाश बिनेदार यांनी यावेळी सभागृहात माहिती देताना सांगितले की, पनवेल महापालिकेची पहिली सार्वत्रिक निवडणूक २०१७ साली झाली. त्यानंतर मुदत संपल्यावर गेली तीन वर्षे प्रशासक होते. येथील महापालिका हद्दीतील पाणीपुरवठ्यासंदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांनी राज्य शासन आणि प्रशासनाकडे सातत्यपूर्ण पाठपुरावा सुरूच ठेवला आहे. संबंधित विभागाचे मंत्री, अधिकारी यांच्यासमवेत नियमित बैठका घेतल्या आहेत. पाण्याचे स्रोत देहरंग धरण, एमजेपी, सिडकोकडून आपल्याकडे पाणीपुरवठा होत असतो. पुढील २५ वर्षांचा विचार करून आमदार प्रशांत ठाकूर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व राज्य शासनाकडे पाठपुरावा केला. त्या अनुषंगाने शिलार धरण प्रकल्प उभारला जाणार आहे तसेच या प्रकल्पाचा भूर्दंड महापालिकेवर येऊ नये यासाठी त्यांनी प्रयत्न केले आहेत. त्यामुळे फक्त शॉर्ट टर्म नाही, तर लॉन्ग टर्मचा विचार करून उपाययोजना केली जात आहे, असेही ॲड. बिनेदार यांनी अधोरेखित केले.

आयुक्त मंगेश चितळे यांनी सांगितले की, पनवेल महापालिकेला दरदिवशी २५८ एमएलडी पाण्याची आवश्यकता आहे. सध्या २१८ एमएलडी पाण्याचा पुरवठा होत आहे. पाणीपुरवठ्यासंदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांनी वारंवार शासन स्तरावर बैठका घेऊन योग्य त्या उपाययोजनांच्या बाबतीत पुढाकार घेतला आहे. सन २०५१मध्ये प्रतिदिन ५०० एमएलडी पाणी लागेल, त्या अनुषंगाने शिलार धरणाचे नियोजन करण्यात आले आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांनी पाणीपुरवठ्यासंदर्भात ऑटोमेशन करण्यासाठी पाठपुरावा केला असून त्या अनुषंगाने सिडकोने टेंडर काढले आहे. त्यामुळे पाणीपुरवठा सुरळीत होण्यास मदत होणार आहे.

पाणीपुरवठ्यासारख्या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर राजकारण न करता सर्वांनी एकत्र येऊन सकारात्मक सहकार्य करणे गरजेचे आहे. एकूणच पाणीपुरवठा हा महत्त्वाचा प्रश्न मानून सत्ताधारी पक्ष काम करत आहे आणि त्या अनुषंगाने उपाययोजना करत असल्याचे जाहीर आहे. त्यास सहकार्य करण्याऐवजी त्यामध्ये खोडा घालण्याच्या दृष्टीने विरोधी पक्ष युक्त्या करत आहे असेच चित्र या महासभेच्या अनुषंगाने पहायला मिळाले.

# आदर्श पतसंस्थेने केला एका वर्षात तीनशे कोटींचा एकत्रित व्यवसाय

**अलिबाग : प्रतिनिधी**

आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेने २०२५ -२६ या एका आर्थिक वर्षात ३०६ कोटी रुपयांचा एकत्रित व्यवसाय केला आहे. एका आर्थिक वर्षात ३०० कोटी रुपयां पेक्षा जास्त एकत्रित व्यवसाय करणारी आदर्श पतसंस्था ही रायगड जिल्ह्यातील पहिली पतसंस्था ठरली आहे. आदर्शने एकूण १०५९ कोटी रूपयांचा एकत्रीत व्यवसाय केला असून आदर्श पतसंस्थेचा एनपीए शून्य टक्के आहे. निव्वळ नफा ०९ कोटी २५ लाख रूपये झाला आहे. मागील वर्षाच्या तुलनेत निव्वळ नफ्यात ०१ कोटी ७४ लाख रूपये वाढ झाली आहे, अशी माहिती आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक सुरेश पाटील व अध्यक्ष अभिजित पाटील यांनी दिली.

आदर्श च्या ठेवी रु. ५९६ कोटी ८८ लाखाच्या असून रु. ४६२ कोटी ३२ लाख रूपयांचे कर्ज आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षापर्यंत आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेने ७५२ कोटी ७७ लाख रूपयांचा एकत्रित व्यवसाय केला होता. मार्च २०२६ पर्यंत १००० कोटी रूपयांचा एकत्रीत व्यवसाय करण्याचे आम्ही नियोजन केले होते. परंतु ग्राहकांनी दाखविलेल्या विश्वासामुळे आज आदर्शचा एकत्रीत व्यवसाय रु. १०५९ कोटी रुपयांवर पोहोचला आहे ,आदर्शचा मोठ्या प्रमाणावर एकत्रित व्यवसाय असूनही ग्रॉस एन पी ए १ टक्या पेक्षा कमी आहे.

सन २०२४-२५ या आर्थिक वर्षापेक्षा २०२५ -२६ या आर्थिक वर्षात ३०६ कोटी ४३लाख रूपयांनी एकत्रित व्यवसाय वाढला आहे. मागील वर्षी ७५२ कोटी ७७ लाख रूपयांचा एकत्रीत व्यवसाय होता. आदर्शचे वसूल भागभांडवल २१ कोटी ८५ लाख रूपये आहे. आदर्श नागरी पतसंस्थेच्या ठेवी ५९६ कोटी ८८ लाख रुपयांच्या आहेत . गेल्या वर्षी ४३४ कोटी ६६ लाख रूपये ठेवी होत्या. त्यात १६२ कोटी २२ लाख रूपयांनी वाढ झाली आहे. २०२४ -२५ या वर्षामध्ये २६८ कोटी रूपये कर्ज होते. २०२५- २६ या आर्थिक वर्षात ४६२ कोटी ३२ लाख रूपये कर्ज आहे. अशी माहिती सुरेश पाटील यांनी दिली.

## डायमंड स्पिरिट फाऊंडेशनचा रविवारी चौथा वर्धापना दिन

**पनवेल :** डायमंड स्पिरिट फाऊंडेशन आपला चौथा वर्धापन दिन रविवारी (दि.५) सामाजिक उपक्रमांनी साजरा करणार आहे. पनवेल तालुक्यातील कुष्ठरोग निवारण केंद्र शांतीवन, नेरे येथे सकाळी १० वा. होणाऱ्या या कार्यक्रमामध्ये शांतीवनातील कुष्ठरोग केंद्रामधील रुग्णांसाठी जेवण, आहारविषयक व्याख्यान आणि मनोरंजनात्मक खेळांचे आयोजन केले आहे. कार्यक्रमासाठी पाहुणे म्हणून सा. पनवेल टाइम्सचे संपादक गणेश कोळी उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाला सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन फाऊंडेशनच्या अध्यक्ष नम्रता धनवडे, शुभदा भूकन, संध्या बेले, रूपाली जोशी, उज्वला राले, अलका आव्हाड, आदिती उपासनी यांनी केले आहे.

## दुखवटा

### प्रकाश आंबेतकर



**माणगाव** : तालुक्यातील मौजे विळे येथील प्रकाश आंबेतकर यांचे शुक्रवार दि. २७ मार्च रोजी दुपारी त्यांच्या राहते घरी विळे,माणगाव येथे अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमई त्यांचे वय - ६८ वर्ष त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली, सुना, नातवंड असा परिवार आहे.त्यांचा दशक्रिया विधी रविवार दि.५ एप्रिल उद्धार पाली येथे होणार असून उत्तरकार्य मंगळवार दि.७ एप्रिल रोजी राहत्या घरी विळे येथे होणार आहेत.

# पनवेल महानगरपालिकेच्या अत्याधुनिक वाहनांचे लोकार्पण

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

'स्वच्छ पनवेल, सुंदर पनवेल' या ध्येयाने कार्यरत असलेल्या पनवेल महानगरपालिकेने शहरातील स्वच्छता आणि नागरी सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी अत्याधुनिक ६ स्काई लिफ्ट वाहने, ४ लिटर पिकर मशीन, २ मेकॅनाइज्ड स्वीपिंग मशीन या अत्याधुनिक वाहनांचा समावेश महापालिकेच्या वाहनांच्या ताफ्यात झाला आहे. या वाहनांचा लोकार्पण सोहळा गुरुवारी (दि. २) आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके सभागृहासमोरील प्रांगणात करण्यात आला.



यावेळी महापौर नितीन पाटील, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, महिला बालकल्याण सभापती ममता म्हात्रे, महापालिका सदस्य, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त स्वरूप खारगे, महापालिका अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनूसार घेण्यात आलेल्या 'लिटर पिकर मशीन' चा वापर महापालिका कार्यक्षेत्रातील कचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्यासाठी करण्यात येणार आहे. या मशीनद्वारे व्हॅक्यूम प्रणालीच्या साहाय्याने कचरा थेट कंटेनरमध्ये संकलित केला जातो. सुमारे ३००० लिटर क्षमतेच्या या यंत्रामुळे कठीण व अरुंद ठिकाणीही स्वच्छता करणे सोपे झाले आहे. या प्रकल्पांतर्गत एकूण चार मशीन खरेदी करण्यात आल्या असून प्रत्येक मशीनची किंमत सुमारे ६० लाख रुपये आहे.

तसेच शहरातील मुख्य रस्त्यांची स्वच्छता अधिक प्रभावीपणे करण्यासाठी यांत्रीकृत रोड स्वीपिंग मशीनचा समावेश करण्यात आला आहे. १६ टन क्षमतेच्या या मशीनमध्ये व्हॅक्यूम असिस्टेड ड्राय आणि वेट क्लिनिंग प्रणाली असून २४०० ते २६०० मिमी रुंदीपर्यंत स्वच्छता करता येते. प्रदूषणमुक्त (PM-१० आणि PM-२.५) स्वच्छतेसाठी प्रगत फिल्टर तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. ही वाहने ताशी ५ ते १० किमी वेगाने कार्य करत असल्यामुळे कमी वेळेत मोठ्या क्षेत्राची स्वच्छता करता येणार असल्याची माहिती उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांनी दिली.

हायड्रालिक स्काय लिफ्ट वाहनांचे लोकार्पण याबरोबर आज, उंच ठिकाणी देखभाल आणि दुरुस्ती कामांसाठी सहा हायड्रालिक स्काय लिफ्ट वाहनांचे लोकार्पण आज करण्यात आले. १५ मीटर, १८ मीटर, १३.५० मीटर उंचीपर्यंत ३६० अंशात फिरणारी ही वाहने आहेत. यामधील तीन वाहने वृक्ष प्राधिकरण विभाग व तीन वाहने विद्युत विभागासाठी राखीव ठेवण्यात आली आहे.

वृक्ष प्राधिकरण विभागाची कामाची व्याप्ती मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. विशेषतः पावसाळ्यापूर्वी व पावसाळ्यात विविध प्रभागांमध्ये अनावश्यक व धोकादायक उंच वृक्षांच्या फांद्यांची छाटणी करणे अत्यावश्यक असते. प्रत्येक प्रभागातील वृक्षांची छाटणीची मागणी होत असल्यामुळे छाटणीचे काम जलदगतीने, सुरक्षित व प्रभावीपणे पार पाडण्यासाठी हायड्रालिक स्काय लिफ्ट वाहनांचा उपयोग होणार आहे.

याचबरोब विद्युत विभागाच्या मागणीनुसार, हायमास्ट पथदिप व्यवस्थेच्या दैनंदिन परिचालन, देखभाल, दुरुस्ती, सुधारणा व नुतनीकरण करणेकरीता स्काय लिफ्ट वाहनांचा उपयोग होणार आहे.

या सर्व आधुनिक यंत्रसामग्रीच्या समावेशामुळे पनवेल शहरातील स्वच्छता व्यवस्था अधिक गतिमान आणि प्रभावी होणार असून नागरिकांना स्वच्छ आणि निरोगी वातावरण मिळण्यास मोठी मदत होणार आहे.

# गटविकास अधिकाऱ्यांच्या आश्वासनानंतर आदिवासी बांधवांचे आमरण उपोषण स्थगित

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

पटसंख्येचे कारण देत प्राथमिक शाळांचे समायोजन करण्याच्या शासन निर्णयामुळे चालू वर्षी रायगड जिल्ह्यात सुमारे ११३५ प्राथमिक शाळा बंद पडण्याच्या अवस्थेत असून या निर्णयाचा मोठा फटका दुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासी समाजावर झाला आहे.

आदिवासी भागात या निर्णयाचा अधिक परिणाम दिसत असून रसायनी येथील ग्रुप ग्रामपंचायत आपटा हद्दीतील कोरलवाडी आदिवासी वाडी येथील शाळा बंद पडल्यामुळे आदिवासी बालके शिक्षणाबाहेर फेकली जाण्याची शक्यता वाढली असतानाच दुसरीकडे कोरळवाडीसह दाभोळवाडी येथे एक वर्षांपूर्वी अंगणवाडी मंजूर होऊनही प्रशासकीय अनास्थेमुळे बालकांना सुरक्षित तथा पोषक वातावरण मिळत नसल्याने या सगळ्याच्या विरोधात ग्राम संवर्धन सामाजिक संस्था आणि कोरळवाडी येथील आदिवासी बांधवांनी बुधवार १ एप्रिल सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली हे उपोषण सुरू असून सुवर्णा वाघे, सोनाली पवार आणि प्रगती वाघे यांनी पंचायत समितीच्या गटविकास यांच्या कार्यालयास मध्ये मदत सुरू केले होते.



जोपर्यंत बंद प्राथमिक शाळा पुन्हा सुरू केली जात नाही आणि अंगणवाडी बांधकामास तात्काळ सुरुवात होत नाही, तोपर्यंत उपोषण मागे घेणार नसल्याचा ठाम इशारा यावेळी उपोषणकर्त्यांनी दिल्यामुळे रात्री उशिरापर्यंत पंचायत समिती सदस्य राजेंद्र पाटील, मयूर शेलार आणि गटविकास अधिकारी यांच्याकडून निव्वळ शाब्दिक विनंती सत्र सुरू राहिले परंतु आंदोलनकरते मात्र आपल्या निर्णयावर ठाम होते त्यामुळे अखेर गुरुवारी २ एप्रिलला मध्यरात्री साडेबाराच्या सुमारास उप अभियंता विनायक तातरे आणि वन विभागाचे वनपाल विनायक ढाकोळ, ग्राम विकास अधिकारी कैलास मोरे यांनी संयुक्तपणे उपोषणस्थळी जावून कोरळवाडी येथील बंद असलेली प्राथमिक शाळा माहे जून २०२६ पासून पुन्हा सुरू करण्यात येणार असून अंगणवाडी इमारतींच्या बांधकामास पुढील २० दिवसांत सुरुवात करण्यात येईल, असे स्पष्ट करीत लेखी पत्र देत उपोषण मागे घेण्याची विनंती केल्याने उपोषणकर्त्यांनी आपले उपोषण तात्पुरते स्थगित केले आहे.

यावेळी आपटा ग्रामपंचायत सरपंच वंदना वाघे, शरद वाघे, ग्रामसंवर्धन सामाजिक संस्थेचे पदाधिकारी महेश पाटील, राजू पाटील, जयवंत पाटील, राजेश रसाळ आदी उपस्थित होते.

## ७ एप्रिलला 'इग्नू'चा प्रादेशिक दीक्षांत समारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाचा (इग्नू) ३९ वा दीक्षांत समारंभ ७ एप्रिल, २०२६ रोजी होणार आहे. ही माहिती मुंबई प्रादेशिक केंद्राचे प्रादेशिक संचालक डॉ. राहुल मिश्रा यांनी सांगितले की, हा भव्य दीक्षांत समारंभ ७ एप्रिल, २०२६ रोजी सकाळी ११ वाजता इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाच्या दिल्ली मुख्यालयात आयोजित केला जाईल. भारताचे माननीय उपराष्ट्रपती सी. राधाकृष्णन हे प्रमुख पाहुणे असतील.

डॉ. मिश्रा यांनी स्पष्ट केले की, दिल्लीतील मुख्य दीक्षांत समारंभासोबतच देशभरातील विविध प्रादेशिक केंद्रांवरही दीक्षांत समारंभ आयोजित केला गेला आहे. याच धर्तीवर, इग्नू मुंबई प्रादेशिक केंद्राचा दीक्षांत समारंभ ७ एप्रिल, २०२६ रोजी सकाळी ११ वाजता सुरू होईल. हा दीक्षांत समारंभ मुंबई विद्यापीठाच्या कलिना कॅम्पसमधील राजीव गांधी सभागृहात आयोजित केला जाईल. मुंबई प्रादेशिक केंद्राचे माननीय कुलगुरू, प्रो. रवींद्र कुलकर्णी हे प्रमुख पाहुणे असतील.

डॉ. मिश्रा म्हणाले की, दीक्षांत समारंभात इग्नूच्या विविध विद्यार्थी साहाय्य केंद्रांचे समन्वयक, शिक्षक आणि इतर शिक्षकेतर कर्मचारी, तसेच उच्च शिक्षण क्षेत्राशी संबंधित मान्यवर उपस्थित राहणार आहेत.



**नवीन पनवेल : सेक्टर ७ पूर्व येथील पिंपळेश्वर हनुमान मंदिरात सलग दुसऱ्यावर्षी हनुमान जयंतीनिमित्त महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या ठिकाणी अध्यक्ष चंद्रकांत म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध धार्मिक कार्यक्रम झाले. त्यावेळी भाविक उपस्थित होते.**

# पनवेलच्या पंचमुखी हनुमान मंदिरात भक्तांची मांदियाळी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलमधील तक्का परिसरात असलेल्या पंचमुखी हनुमान मंदिरात हनुमान जयंतीनिमित्त दर्शन घेण्यासाठी पंचक्रोशीतील भक्तांची मांदियाळी होती.

या निमीत्ताने आज पहाटे पासूनच श्री हनुमान जन्मोत्सव सोहळा, रामायण पारायण, धार्मिक कार्यक्रम, कीर्तन अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करून विविध मंदिरामध्ये शनिवारी हनुमान जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या अंतर्गत तक्का येथील पंचमुखी हनुमान मंदिरामध्ये विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. तर संध्याकाळी "श्री हनुमान उत्सवमुर्ती रथयान्ना", ध्वजा अवरोहणम् आयोजित करण्यात आले होते. तसेच भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन देखील करण्यात आले होते.



यंदा जागतिक युद्धाच्या पार्श्वभूमीवर सर्वत्र गॅस सिलेंडरचा तुटवडा असल्याने महाप्रसाद सोहळयाला खंड पडू नये यासाठी ट्रस्टच्या वतीने चुलीवर महाप्रसाद तयार करण्यात आले. या महाप्रसादाचा सुमारे १० हजार भाविकांनी लाभ घेतला अशी माहिती मुख्य ट्रस्टी अशोक गिल्डा व सचिव जगदिश लाहोटी यांनी दिली. या जन्मोत्सवाच्या सोहळ्याला अनेक भावीकांनी भेट देऊन मनोभावे दर्शन घेतले तसेच महाप्रसादाचा लाभ घेतला.

# उरणमध्ये हनुमान जन्मोत्सव साजरा

**उरण : वार्ताहर**

हनुमान जयंती असल्याने उरण शहर सह ग्रामीण भागात हनुमान जयंती मोठ्या उत्सवात साजरी केली. उरण शहरातील हनुमान कोळीवाडा, मोरा कोळीवाडा, गणपती चौक येथे हनुमान जयंती साजरी करण्यांत आली.



सालाबादप्रमाणे यंदाही गुरुवार (दि.२)एप्रिल रोजी श्री हनुमान जन्मोत्सव सामाजिक मंडळ याच्या वतीने श्री हनुमान जन्मोत्सव साजरा करण्यात आला. त्या निमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

पहाटे ४ वाजता महापूजा, पहाटे ५ वाजता ह.भ.प. सुधीर बाळ (रा. डोंबिवली) यांचे कीर्तन झाले. सकाळी ८ ते दुपारी १२ वाजेपर्यंत श्री गजाजन प्रसादिक भजन मंडळ यांचे भजन, दुपारी १२ ते ३ वाजेपर्यंत कै. सुनिता ढोले व कै.मीना रूपचंदानी यांच्या स्मरणार्थ महाप्रसादाचे आयोजन करण्यांत आले होते ढोले परिवार व रूपचंदानी परिवार यांनी महाप्रसादासाठी भरपूर मेहनत घेतली. सायंकाळी ४ ते ७ शारदा संगीत भजन मंडळ यांचे भजन, रात्रो ९ वाजता पालखी मिरवणूक काढण्यात येणार आहे.

हनुमान जन्मोत्सव सामाजिक मंडळाचे अध्यक्ष अशोक कडू, उपाध्यक्ष महेश अधिकारी, सचिव अॅड .रोहित पाटील, खजिनदार धनजंय भागवत महाराज, सहसचिव अॅड. रेखा पाटील,सल्लगार विठ्ठल ममताबादे, सहखजिनदार मनोज म्हात्रे, रघुनाथ बुवा हातनोलकर, चंद्रकांत साठे, महादेव ढोले, विनोद रुपचंदानी, अरुण मोदी, गजानन भोईर, नितीन वर्तक व कार्यकारी महिला सभासद सुविधा म्हात्रे, प्राजक्ता भागवत, मिलिंद माळी आदींनी सहकार्य केले व हनुमान जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यांत आला. सर्व भक्तांना सामाजिक कार्यकर्ते कल्पेश ठक्कर यांच्या वतीने खिचड़ी चे वाटपकरण्यांत आले.

# पनवेलमध्ये हनुमान जयंती उत्साहात



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

संपूर्ण पनवेल तालुक्यात हनुमान जयंतीचा उत्सव मोठ्या उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. या मंगल दिनाचे औचित्य साधून तालुक्यातील दुंदरे, आंबे, नेरे, तक्का, कोळखा आणि चिखले या गावांमध्ये विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

या सर्व गावांमधील उत्सवांना भारतीय जनता पक्षाचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी भेट देऊन हनुमंताचे दर्शन घेतले आणि ग्रामस्थांना शुभेच्छा दिल्या. या वेळी अरुणशेठ भगत यांच्यासोबत पनवेल पंचायत समितीच्या सभापती रंजना वास्कर, उपसभापती भुपेंद्र पाटील आणि माजी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

या धार्मिक सोहळ्याला माजी सरपंच सदाशिव वास्कर, माजी सरपंच शांताराम पोपेटा, यतीन पाटील, रमेश पाटील, सुनील पाटील, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, तालुका सरचिटणीस विश्वजीत पाटील, नवीन पनवेल अध्यक्ष मयुर कदम यांच्यासह पदाधिकारी आणि मान्यवर उपस्थित होते. तालुक्यातील प्रत्येक गावात हनुमान चालिसा पठण, महाप्रसाद आणि पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.







# उन्हाळ्यात फुलांचा बहर अन् मोहर...



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

गाव, शहर अन् रानावनातील वृक्षांना बहर ..मोहर येऊ लागतो ..वृक्षांचा हा बहर मोहर म्हणजे लवकरच उन्हाळा येणार असल्याची चाहूल देतो रसायनीचे निसर्ग अभ्यासक, कवी, लेखक, चारोळीकार अनिल दाभाडे यांनी व्यक्त केले.

आंब्याचा मोहर, कडूनिंबाचा बहर, करवंदाला आलेली फुले, पळसाची फुले, फुललेला बहावा, पांगारा, गुलमोहर अन् शाल्मली (काटेसावर) ही वृक्ष तर फुलांच्या बहरांनी गाव, शहरात, अन् रानोरानी बहरलेली दिसून येतात.

निसर्ग अभ्यासक अनिल दाभाडे यांनी पुढे असे सांगितले की, या सर्व वृक्षांना आलेला मोहर.. बहर म्हणजे गाव ,शहरात, रानोरानी जणू निसर्ग रंगल्याचे मनमोहक दृश्य दिसू लागते. फुलांचा हा बहर नी मोहर फुलपाखरे, भुंगे, अन् पक्ष्यांसाठी तर एक पर्वणीच ठरते. त्यांना आपल्या आवडीचा मकरंद या फुलांच्या बहरातून प्यायला मिळतो.

निसर्गातील हे क्षण पक्षी, भुंगे, फुलपाखरांसाठी आनंददायी क्षण असतात. निसर्ग अभ्यासकांना अभ्यासासाठी व निरीक्षण करण्याची एक संधी लाभते तर रानवेड्या रसिकांना हे दृश्य मनाला भुरळ घालणारे असते असे शेवटी पक्षीनिरीक्षक अनिल दाभाडे यांनी सांगितले.

## रेल्वेच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पोलीस ठाण्याहद्दीमध्ये आपटा गावाच्या जवळील पाताळगंगा नदीच्या पुलावरील रेल्वे पटरीवर ३० वर्षीय तरूणाचा मृत्यू झाल्याची घटना घडली असून महेश मोहन वाघे (वय ३०, रा.तपोरा वाडी, सारसई, ता. पनवेल) हा रेल्वे पटवरीवरून जात असताना रेल्वेची ठोकर लागल्याने त्याला गंभीर दुखापत होवून मृत्यू झाला.

त्याला उपचाराकरिता ग्रामीण रूग्णालय चौक येथे नेले असता डॉक्टरांनी मयत घोषित केले असून गजानन बाळू पवार याने रसायनी पोलीस ठाण्यात खबर दिली आहे. रसायनी पोलीस ठाण्यात बीएनएस कलम प्रमाणे आकस्मात मृत्यू म्हणून नोंद करण्यात आली असून रसायनी पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक अभिजित भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार मेहेत्रे अधिक तपास करीत आहेत.

## संपादकीय

# मानसिक सक्षमता हवी

एआयमुळे भविष्यात कोणती आर्थिक, सामाजिक आव्हाने वाढून ठेवली आहेत यांची वारंवार चर्चा होण्याची सध्या गरज आहे. एआयमुळे येत्या काळात मानवी जीवनात वेगाने बदल घडून येणार आहेत हे संबंधित क्षेत्रातील तज्ज्ञ पुन्हा पुन्हा सांगत आहेत. त्यासाठी आवश्यक ती कौशल्ये आत्मसात करून सर्वार्थाने सज्ज राहणे एवढेच आपल्या हातात आहे. त्याअनुषंगाने येणाऱ्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सगळ्यांना आर्थिक तसेच मानसिकदृष्ट्याही सक्षम राहण्याची गरज आहे.

**एकीकडे अमेरिका-इस्रायल-इराण युद्धामुळे जगभरात आर्थिक अस्थैर्याचे सावट आहे. अशातच एआयमुळे ओरॅकल या अमेरिकेतील बड्या टेक कंपनीने 30 हजार कर्मचाऱ्यांना कामावरून काढले आहे. यात तब्बल 12 हजार भारतीयांनी आपली नोकरी गमावली. एआयमुळे मोठ्या प्रमाणात नोकऱ्या जाण्याची ही सुरुवात तर नव्हे अशी शंकेची पाल त्यामुळे अनेकांच्या मनात चुकचुकली. एप्रिल महिन्याच्या पहिल्याच सकाळी पाच ते सहाच्या दरम्यान ओरॅकल या बहुराष्ट्रीय तंत्रज्ञान कंपनीतील जवळपास 30 हजार कर्मचाऱ्यांना नोकरीवरून काढण्यात आले असल्याचा मेल प्राप्त झाला. काही वेळातच त्यांचे इंटर्नल सिस्टम ॲक्सेस बंद करण्यात आले. कोणतीही पूर्वसूचना न देता कंपनीकडून लगेचच नोकरी संपुष्टात आल्याचे पत्रही देण्यात आले. कंपनी एका महिन्याच्या आत आणखी मोठ्या प्रमाणावर कर्मचारी कपात करण्याची योजना आखते आहे असेही सांगण्यात येते. यातल्या असंख्य कर्मचाऱ्यांनी एक्स वा अन्य समाजमाध्यमांवर आपला हा अनुभव शेअर केला. यातल्या काहींनी तब्बल वीस वर्षांच्या सेवेनंतर अशातऱ्हेने नोकरी संपुष्टात येणे धक्कादायक असल्याचे म्हटले तर काहींनी चारएक वर्षांतल्या तिथल्या सेवेत काय काय शिकलो याचा पाढा वाचून लगेच पुढील नोकरीसाठी आपण उपलब्ध असल्याची घोषणा करत सकारात्मकता दाखवली. याच सुमारास बंगळुरू येथे आयटी क्षेत्राशी संबंधित एका तरुण जोडप्याने आत्महत्या केल्याची घटनाही समोर आली. मानसिक तणाव व आर्थिक अडचणींमुळे या जोडप्याने हे पाऊल उचलल्याचे कळते. मूळच्या तेलंगणा येथील 32 वर्षीय सॉफ्टवेअर इंजिनिअर भानू चंद्रा रेड्डी याने घरात गळफास लावून आत्महत्या केली तर त्याच्या आत्महत्येविषयी समजताच धक्का बसलेल्या त्याच्या पत्नीने इमारतीच्या 18 व्या मजल्यावरून उडी घेत आपले जीवन संपवले. बराच काळ हे जोडपे अमेरिकेत होते. एआयमुळे अमेरिकेतली नोकरी गमावल्यापासून रेड्डी गेले वर्षभर बंगलोरमध्ये नोकरी मिळवण्यासाठी संघर्ष करत होता. त्याच्या पत्नीला बिबी शाझिया सिराज हिला अलीकडेच आयबीएमसारख्या बड्या टेक कंपनीत नोकरी मिळाली होती. या दोघांचा आंतरधर्मीय विवाह हेही त्यांच्यावरील तणावाचे कारण होते. रेड्डीच्या कुटुंबाला हे लग्न मान्य नव्हते तर शाझियाने आपल्या कुटुंबाला या विवाहाविषयी काही सांगितलेच नव्हते. पतीला पुन्हा चांगली नोकरी मिळाल्यानंतर सांगण्याचे तिने ठरवले होते. परंतु रेड्डीला नोकरी मिळत नसल्याने तो नैराश्याने ग्रासला होता. या घटनेला विशिष्ट परिस्थितीची पार्श्वभूमी असली तरी आयटी क्षेत्रातील नोकऱ्यांची स्थितीही त्यामुळे अधोरेखित होतेच. या क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांवरील पराकोटीचा ताण यापूर्वीही अनेक घटनांमधून वारंवार समोर आला आहे. सध्या तणाव आणि नैराश्य यांसारख्या मानसिक आजारांचे प्रमाण एकंदरच वाढते आहे. अशात युद्धजन्य परिस्थिती व एआयमुळे सर्वच क्षेत्रांतील नोकऱ्यांमध्ये उलथापालथीची शक्यता आहे. त्यामुळे वेळीच सुयोग्य पावले उचलून स्वतःला आर्थिक व मानसिकदृष्ट्या सक्षम ठेवण्याची खबरदारी घेण्याची गरज आहे.**

# गतिमान प्रशासनासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग : राज्यात साधना सप्ताह

लोकशाही शासन व्यवस्थेमध्ये सर्व सामान्य जनतेला शासनाच्या विविध योजना व कार्यक्रमांद्वारे सोयी, सुविधा, लाभ आदी पोचविण्यासाठी शासन सक्षमपणे कार्य करते. आणि या व्यवस्थेची भिस्त असणारी प्रशासन व्यवस्था त्यामुळेच सक्षम असावी लागते. प्रशासनात कार्य करणाऱ्या सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी उपयोग करता यावा यासाठी विविध प्रशिक्षणांद्वारे क्षमता विकास करण्यात येते. याचाच एक भाग म्हणून केंद्र शासनाने क्षमता विकास आयोग (सीबीसी) आणि- कर्मयोगी भारत यांच्या संयुक्त विद्यमाने २ ते ८ एप्रिल २०२६ या कालावधीत 'साधना सप्ताह' आयोजित केला आहे. महाराष्ट्रातही मंत्रालयीन व राज्यभरातील विविध शासकीय कार्यालयातील अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी 'साधना सप्ताह' अंतर्गत ऑनलाइन प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.

आधुनिक तंत्रज्ञानाचा सर्व क्षेत्रात होत असलेला वापर पाहता राज्य शासनाचाही तंत्रज्ञानाधारित कार्यक्रमात पुढाकार राहिला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्याच्या गतिमान प्रशासनाची घोडदौड सुरू आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून राज्यात १०० दिवसांचा प्रशासकीय सुधारणा कार्यक्रम आणि १५० दिवसांचा ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रम यशस्वीपणे राबविण्यात आला. या पाठोपाठ आता केंद्रशासनाचा 'साधना सप्ताह' राज्यात राबविण्यात येणार आहे. राज्य शासनाच्या मंत्रालयीन सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी तसेच विभागीय आयुक्त कार्यालये आणि विभागांतर्गत येणारे जिल्हाधिकारी कार्यालये, जिल्हा परिषद आदींमध्ये अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी या सप्ताह अंतर्गत कृत्रिम बुद्धिमत्ता, सायबर सुरक्षा यासह प्रशासनातील विविध विभागामध्ये सक्षमपणे कार्य करण्यासाठी तंत्रज्ञानाच्या



उपयोगाधारित प्रशिक्षण देण्यात येणार आहे. विशेष म्हणजे या मोहिमेअंतर्गत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विभाग आणि कार्यालय प्रमुखांना मे २०२६ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या 'TECH-वारी २.०' या कार्यक्रमावेळी प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

'कर्मयोगी भारत' हा केंद्र शासनाचा एक डिजिटल प्लॅटफॉर्म व अभिनव राष्ट्रीय उपक्रम आहे. तंत्रज्ञानआधारित शिक्षणाद्वारे शासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता, कौशल्य आणि शासनक्षमता वाढविण्यासाठी या प्लॅटफॉर्मवर विविध प्रशिक्षण कार्यक्रम उपलब्ध करून देण्यात आले आहेत. केंद्र शासनाने 'साधना सप्ताह' अंतर्गत शासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी कर्मयोगी प्लॅटफॉर्म वरील तंत्रज्ञानाधारित ५० प्रशिक्षण कार्यक्रमांची यादी तयार केली आहे. या सप्ताह अंतर्गत प्रत्येक अधिकारी-कर्मचाऱ्यांनी यादीतील एकूण प्रशिक्षण कार्यक्रमांपैकी किमान चार तासांचे प्रशिक्षण करणे अनिवार्य आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये 'लोकप्रशासनासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता', 'आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या मूळ बाबी : शिकणे, उपयोग आणि नैतिकता', 'प्रशासनासाठी जबाबदार एआयचा उपयोग', 'सर्वांसाठी युवा ए आय' असे एकूण ४४ मिनिटे ते ४६ तास काल मर्यादेचे एकूण ५० प्रशिक्षण कार्यक्रम कर्मयोगी प्लॅटफॉर्मवर उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

**महासंचालकांच्या पुढाकाराने माहिती व जनसंपर्क विभागातही 'साधना सप्ताह'**

केंद्र शासनाच्या सूचनानुसार प्रशासकीय क्षमता सुधारण्यासाठी राबविण्यात येत असलेला 'साधना सप्ताह' हा माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांच्या मार्गदर्शनात व नेतृत्वात या विभागात राबविण्यात येणार आहे. महाराष्ट्रातील सर्व जिल्हा माहिती कार्यालये, मुंबई येथील या विभागाचे मुख्यालय तसेच महाराष्ट्र परिचय केंद्र नवी दिल्ली आणि पणजी येथील कार्यालयांमधील १००२ अधिकारी-कर्मचारी 'साधना सप्ताह' अंतर्गत विविध प्रशिक्षण पूर्ण करणार आहेत. महासंचालक ब्रिजेस सिंह यांनी या संदर्भात बैठक घेऊन विभागाला सूचना दिल्या आहेत.

**माहिती संचालनालयाच्या नागपूर- अमरावती विभागातही साधना सप्ताहाचा उत्साह**

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या नागपूर- अमरावती विभागातही 'साधना सप्ताह' अंतर्गत विभागातील एकूण १७४ अधिकारी- कर्मचारी या प्रशिक्षणात सहभागी होणार आहेत. यापूर्वी विभागातील शिपाई, वाहन चालक या वर्ग 'ड' पासून वरिष्ठ वर्ग 'अ' पर्यंतच्या सर्वच अधिकारी-कर्मचाऱ्यांनी कर्मयोगी भारत पोर्टलवरील प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण केले आहे. यामध्ये विशेषतः अमरावती विभागातील अकोला जिल्हा माहिती अधिकारी हर्षवर्धन पवार यांनी ३९० तास काल मर्यादेचे २९४ प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण केले आहेत. तर नागपूर विभागातून गडचिरोली चे प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी गजानन जाधव यांनी ६० तास काल मर्यादेचे एकूण ६३ प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण केले आहे. साधना सप्ताहातही नागपूर अमरावती विभागातील माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे सर्व अधिकारी कर्मचारी हिरीरीने भाग घेऊन विहित काल मर्यादेचे प्रशिक्षण पूर्ण करणार आहेत आणि या संदर्भातील नियोजन करण्यात आले असल्याचे विभागाचे माहिती संचालक डॉ. गणेश मुळे यांनी सांगितले आहे.

बदलत्या काळानुसार आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करून प्रशासनाला गतिमान करण्यासाठी शासन स्तरावर सतत वेगवेगळे उपक्रम राबविण्यात येत असतात. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सायबर सुरक्षा या नव्या आव्हानात्मक विषयांचा परिचय होऊन प्रशासनातील अधिकारी-कर्मचाऱ्यांना अधिक सक्षमपणे व गतिमानतेने आपल्या जबाबदाऱ्या पार पाडता याव्या यासाठी केंद्र शासनाचा 'साधना सप्ताह' राज्यभर राबविण्यात येत आहे. सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांनी या सप्ताहात सक्रिय भाग घेऊन जनता व शासनाप्रती आपली प्रतिबद्धता दृढ करण्याचे आवाहनही शासनातर्फे करण्यात आले आहे.

**-रितेश भुयार,**
माहिती अधिकारी,
माहिती व जनसंपर्क, नागपूर

# सुप्रसिद्ध गायक पद्मश्री हरिहरन

आपल्या मखमली आवाजाने चाहत्यांना वेड लावणारे गायक हरिहरन यांची गाणी चाहत्यांच्या जिभेवर नेहमीच रेंगाळताना दिसतात. गायक हरिहरन यांचा जन्म ३ एप्रिल १९५५ रोजी केरळातील एका तमिळ संगीतकाराच्या कुटुंबात जन्मला आले. अगदी लहान वयातच त्यांना संगीत शिकण्याचा ध्यास लागला होता हरिहरन यांनी हिंदीव्यतिरिक्त मल्याळम, तेलगू, कन्नड, भोजपुरी आणि मराठी भाषांमध्ये आपल्या आवाजाची जादू पसरविली आहे. १९९२ सालापासून त्यांनी ए.आर.रहमानबरोबर गाणे गाण्यास सुरूवात केली आणि त्यानंतर पुन्हा कधीही मागे वळून पाहिले नाही. संगीत कारकिर्दीत त्यांना २ वेळा राष्ट्रीय पुरस्कारानेही सन्मानित करण्यात आले 'रोजा जानेमन.' हे गाणं आठवताच पहिला हरिहरन यांचा चेहरा डोळ्यासमोर येतो. जे मऊ, सुमधुर, मखमली



आणि तारासप्तकपर्यंत पोहोचणाऱ्या सुरांचे जादुगार आहेत. 'जुनून' या मालिकेच्या शीर्षक गीतामुळे त्यांना प्रसिद्धी मिळाली आणि नंतर त्यांचा आवाज इतर अनेक मालिकांमध्ये झळकला. मात्र, या क्षेत्रात येण्यापूर्वी हरिहरन यांनी १९७७मध्ये 'गमन' या चित्रपटासाठी गाणे गायले होते. दिवंगत संगीत दिग्दर्शक जयदेव यांना त्यांनी आपल्या कारकिर्दीची सुरुवात करण्याचे श्रेय दिले.

'रोजा'साठी मणिरत्नम यांनी रहमान आणि हरिहरन या दोघांवरही विश्वास टाकला. आणि हा चित्रपट व यातील गाणी सुपर हिट झाली. १९९८ मध्ये हरिहरन आणि अनु मलिकबरोबर 'बॉर्डर' या हिंदी चित्रपटासाठी काम केले. त्यावर्षी मेरे दुश्मन मेरे भाई या गाण्यासाठी त्यांना सर्वोत्कृष्ट पार्श्वगायकाचा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. जोगवा या चित्रपटातील 'जीव रंगला' या मराठी गाण्यासाठी आणखी एक राष्ट्रीय पुरस्कार मिळाला.

**(साभार : इंटरनेट)**



## बदलते तंत्रज्ञान

# रॉयल एनफिल्ड गुरिल्ला ४५० लॉन्च

रॉयल एनफिल्ड आपली लोकप्रिय बाईक गुरिल्ला ४५० चे २०२६ मॉडेल २७ मार्च रोजी लॉन्च केले . कंपनीने याचा नवीन टीझर जारी केला आहे. नवीन मॉडेलमध्ये ग्राहकांच्या फीडबॅकच्या आधारावर अनेक यांत्रिक आणि कॉस्मेटिक बदल पाहायला मिळू शकतात.



सस्पेंशनमध्ये बदलः राइड आता अधिक आरामदायक होईल सध्याच्या मॉडेलमध्ये काही रायडर्सनी याच्या मागील मोनोशॉक सस्पेंशनला थोडे कडक म्हटले होते. २०२६ च्या मॉडेलमध्ये कंपनी ते मऊ करू शकते, ज्यामुळे खराब रस्त्यांवर बाईक चालवणे सोपे होईल. याव्यतिरिक्त, टॉप व्हेरिएंट्समध्ये समोर अपसाइड डाउन फोर्क्स दिले जाऊ शकतात, तर बेस व्हेरिएंटमध्ये पूर्वीप्रमाणे टेलिस्कोपिक फोर्क्सच मिळण्याची अपेक्षा आहे.

बाईकमध्ये राइड-बाय-वायर थ्रॉटल आधीपासूनच येते, त्यामुळे कंपनी आता यात 'क्रूझ कंट्रोल' हे फीचर जोडू शकते. यासोबतच सुरक्षिततेसाठी 'ट्रॅक्शन कंट्रोल' देखील दिले जाऊ शकते, जे ओल्या किंवा निसरड्या रस्त्यांवर बाईकची स्थिरता राखण्यास मदत करेल. यात 'बाय-डायरेक्शनल क्विकशिफ्टर' मिळू शकते, ज्यामुळे वारंवार क्लच दाबण्याची गरज पडणार नाही.

नवीन अपडेटमध्ये कंपनी रस्त्यावर चांगल्या पकडीसाठी रोड-बायस्ड रेडियल टायर देऊ शकते. यामुळे कॉर्नरिंग करताना रायडरचा आत्मविश्वास वाढेल. यात हँडलच्या कोपऱ्यात लावलेल्या मिररचा पर्यायही मिळू शकतो.

रॉयल एनफील्ड आपल्या नवीन मॉडेल्समध्ये रंगांसोबत प्रयोग करते. गुरिल्ला ४५० मध्ये काही जुने रंग काढून नवीन मॅट फिनिश आणि ड्युअल-टोन रंग समाविष्ट केले जाऊ शकतात. बाईकची व्हिज्युअल अपील वाढवण्यासाठी यात नवीन स्पोर्टी ग्राफिक्स देखील दिले जाऊ शकतात. इंजिन आणि परफॉर्मन्समध्ये बदल नाही


बाईकच्या इंजिनमध्ये बदलाची अपेक्षा नाही. यात तेच ४५२cc चे लिक्विड कूल्ड, सिंगल सिलेंडर शेरपा इंजिन मिळेल. हे ४० PS पॉवर आणि ४० Nm टॉर्क जनरेट करते.

यात ६-स्पीड ट्रान्समिशन आणि स्लिपर क्लच स्टँडर्ड आहे. बाईकचे वजन १८४ KG आहे आणि तिची सीट हाईट ७८०mm आहे, ज्यामुळे ती कमी उंचीच्या रायडर्ससाठीदेखील आरामदायक ठरते.

# संस्कृत विद्वान, प्राच्यविद्यासंशोधक डॉ. वा.वि.मिराशी

आंतरराष्ट्रीय कीर्तीचे भारतीय प्राच्यविद्यासंशोधक व भारतविद्यातज्ज्ञ. त्यांचा जन्म १३ मार्च १८९३ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील कुवळे (सध्या जि.सिंधुदुर्ग) येथे मध्यमवर्गीय कुटुंबात विष्णू व राधाबाई या दाम्पत्यापोटी झाला. त्यांचे शिक्षण राजाराम हायस्कूल व राजाराम कॉलेज, कोल्हापूर येथे तसेच पुणे येथील डेक्कन कॉलेजमध्ये झाले. त्यांनी मॅट्रिक, बीए आणि एमए या परीक्षांत प्रथमवर्ग पटकाविला. त्यांनी सुरुवातीस मुंबईतील शासकीय एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये संस्कृत विषयाचे प्राध्यापक म्हणून काम केले. या काळात त्यांनी एलएलबी पदवी प्राप्त केली तसेच मुंबई विद्यापीठात प्रबंध सादर केला.

पुढे नागपूरच्या मॉरिस कॉलेजात व नंतर अमरावती येथील किंग एडवर्ड कॉलेज येथे संस्कृत या विषयाचे प्राध्यापक व प्राचार्य म्हणून सेवानिवृत्तीपर्यंत काम केले. नागपूर विद्यापीठात (आताचे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर) त्यांनी सन्मान्य व गुणश्री प्राध्यापक म्हणून काम केले. काही काळ तेथील पदव्युत्तर मानव्यशास्त्र विभागाचे प्रमुख म्हणूनही त्यांनी जबाबदारी स्वीकारली. नागपूरमधील विदर्भ संशोधन मंडळ स्थापनेत त्यांचा महत्त्वाचा वाटा होता. या संस्थेचे ते कार्याध्यक्ष होते. प्राचीन शिलालेख, नाणी आणि अभिजात प्राचीन संस्कृत साहित्य ही



## निमित्त

त्यांची प्रमुख कार्यक्षेत्रे. त्यांनी वाकाटकांच्या ताम्रपटांचा आणि शिलालेखांचा मागोवा घेऊन सध्याचे रामटेक म्हणजेच मेघदूतातील रामगिरी होय, असा सिद्धांत मांडला. हा सिद्धांत त्यांनी मेघदूतातील रामगिरी अर्थात रामटेक या नावाने प्रकाशित केला. खुद्द रामटेकला रामगिरीस्वामींचा उल्लेख असलेला वाकाटक राणी प्रभावती गुप्ता हिचा शिलालेख एका वाकाटककालीन मंदिरात १९८०च्या दशकात सापडला, तो या सिद्धांताला पूरक ठरला. त्याचप्रमाणे अजिंठ्याच्या लेणे क्रमांक १६ येथील वाकाटक लेखाचे वाचन करून नंदिवर्धन (विद्यमान रामटेकजवळील नगरधन) व वत्सगुल्म (विद्यमान वाशिम जिल्ह्याचे ठिकाण) या ठिकाणी वाकाटक राजवंशाच्या दोन शाखा होत्या हे सिद्ध करून त्यांनी वाकाटक वंशावळ निश्चित केली. अजिंठ्याच्या लेखातील 'सुवीथि' या शब्दाचे योग्य वाचन करून अजिंठ्याच्या लेणी क्रमांक १६,१७,१९ व २१मधील भित्तिचित्रे वाकाटकांच्या कारकिर्दीत काढली गेली हे त्यांनी स्पष्ट केले. त्यांच्या या प्रदीर्घ व सखोल संशोधनाचा गुणगौरव 'वाकाटकांच्या इतिहासाचे अधिकारी' असा उल्लेख आढळतो.

शिलालेख व ताम्रपट यांच्या अचूक वाचनाबरोबरच नाणकशास्त्रातही त्यांनी अजोड कामगिरी केली. संस्कृत साहित्यातील त्यांचे विशेष योगदान त्यांच्या कालिदास, भवभूती, हर्षचरितसार व लघुकौमुदी या पुस्तकांतून दिसून होते. याशिवाय त्यांनी संशोधन मुक्तावलिमधून संशोधनात्मक लेख लिहिले.

कॉर्पस् इन्स्क्रिप्शनम् इंडिकॅरम् या ग्रंथमालेचे मिराशी हे पहिले भारतीय संपादक होत. या नियतकालिक परंपरेतून त्यांनी कलचुरी नृपति व त्यांचा काल, वाकाटक नृपति व त्यांचा काल, शिलाहार राजवंशाचा इतिहास व कोरीव लेख, सातवाहन व पश्चिमी क्षत्रप यांचा इतिहास व कोरीव लेख इत्यादी प्राचीन राजवंशांवरील ग्रंथ लिहिले. त्यांना अनेक शिष्यवृत्त्या, पारितोषिके, पदव्या, मान-सन्मान, पुरस्कार लाभले. नागपूर येथे ३ एप्रिल १९८५ रोजी त्यांचे निधन झाले.

**(साभार : इंटरनेट)**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर



# युरिक ॲसिडमुळे शरीरावर होतात गंभीर परिणाम

आपल्या शरीरात यूरिक ॲसिडचे प्रमाण वाढल्यामुळे त्याचा आपल्या शरीरावर गंभीर परिणाम होतो. मग काही लोकांचे सांधे जड होतात, त्यांचे हात पाय दुखतात तर काही लोकांच्या पायाला सूज येते, त्यांना थकवा येतो किंवा त्यांच्या टाचा दुखतात. तर अशा समस्यांपासून जर तुम्हाला आराम मिळवायचा असेल तर फळं खाणं खूप गरजेचं आहे.

संत्री-हे फळ खाल्ल्यामुळे आपल्या शरीरात युरिक ॲसिडची पातळी नियंत्रणात आणण्यास मदत होते. संत्रामध्ये विटामिन सी असते त्यामुळे ते आपल्या किडनीचे आरोग्य सुधारते तसेच यूरिक सिडची पातळीदेखील नियंत्रित करते. तसेच संत्री खाल्ल्यामुळे सांधेदुखी पासूनदेखील आराम मिळतो. सोबतच यूरिक सिड वाढल्यानंतर टाच दुखत असेल तर संत्री खा यामुळे तुमची टाच दुखीदेखील कमी होण्यास मदत होईल.

किवी-जर तुमच्या शरीरात यूरिक सिडचे प्रमाण जास्त असेल तर तुम्ही किवी जरूर खा. किवीमध्ये अनेक पौष्टिक घटक असतात जे युरिक ॲसिडचे प्रमाण नियंत्रणात आणण्यास मदत करतात. किवीमध्ये पोटॅशियम, विटामिन सी, फोलेट, विटामिन ई असते जे यूरिक ॲसिड नियंत्रणात आणण्यास मदत करते.

स्ट्रॉबेरी- युरिक ॲसिड नियंत्रणात आणण्यासाठी स्ट्रॉबेरी मदत करते. स्ट्रॉबेरीमध्ये देखील विटामिन सी असते ज्यामुळे आपल्याला सांधेदुखीपासून आराम मिळतो. स्ट्रॉबेरीमध्ये फायबर, कॅल्शियम, विटामिन सी, मॅग्नेशियम असे पोषक घटक असतात जे आपलं शरीर निरोगी ठेवतात आणि यूरिक ॲसिड नियंत्रणात आणण्यासाठी मदत करतात. यासाठी तुम्ही स्ट्रॉबेरीचा रस देखील घेऊ शकता.

अननस-हे फळदेखील युरिक ॲसडची पातळी नियंत्रणात आणण्यास मदत करतो. अननसामध्ये विटामिन सी भरपूर प्रमाणात असते जे फायबर प्युरीन पचवण्यास मदत करते. जर तुम्हाला युरिक ॲसिडचा त्रास होत असेल तर अननसाचे सेवन जरूर करा. त्यामुळे तुमची युरिक ॲसिडची पातळी नियंत्रणात आणण्यास मदत होईल.

# रायगडात पेट्रोल-डिझेलच्या खुल्या विक्रीवर बंदी

## जिल्हाधिकाऱ्यांनी जारी केला आदेश






**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

समाजमाध्यमांवर पेट्रोल-डिझेल तुटवड्याच्या अफवा पसरत असल्याच्या पार्श्वभूमीवर रायगड जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पेट्रोल-डिझेलच्या खुल्या विक्रीवर जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी बंदी घातली आहे.

सार्वजनिक सुरक्षिततेच्या दृष्टीने ज्वलनशील पदार्थांच्या मुक्त विक्रीमुळे अनुचित घटना घडण्याची शक्यता लक्षात घेऊन ही प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आली आहे. पेट्रोलियम नियम २००२ अंतर्गत दिलेल्या अधिकारांचा वापर करून जिल्ह्यातील सर्व पेट्रोल पंप चालक व मालकांना याबाबत स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार पेट्रोल व डिझेलची विक्री केवळ वाहनांच्या इंधन टाकीतच करावी लागणार असून कोणत्याही परिस्थितीत कॅन, बाटली किंवा इतर अनधिकृत कंटेनरमध्ये इंधन भरण्यास व विक्रीस सक्त मनाई करण्यात आली आहे.

याशिवाय सर्व पेट्रोल पंपांवर सीसीटीव्ही यंत्रणा कार्यरत ठेवणे व विक्रीची नोंद नियमितपणे राखणे बंधनकारक करण्यात आले आहे. अनधिकृतपणे पेट्रोल-डिझेल साठवणूक करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध जीवनावश्यक वस्तू अधिनियम १९५५ अंतर्गत कडक कारवाई करण्यात येणार आहे. हा आदेश तत्काळ प्रभावाने लागू करण्यात आला असून पुढील आदेश येईपर्यंत तो कायम राहणार आहे.

या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती किंवा संस्थांविरुद्ध पेट्रोलियम नियम २००२ भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ तसेच आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अंतर्गत दंडात्मक व फौजदारी कारवाई करण्यात येईल, असे जिल्हा प्रशासनाने स्पष्ट केले आहे. नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवता सहकार्य करण्याचे आवाहनही प्रशासनाने केले आहे.

# उन्हापासून दिलासा मिळण्यासाठी मुक्या प्राण्यांनी घेतला डबक्याचा आधार



**खोपोली : प्रतिनिधी**

उन्हाचा पारा दिवसेंदिवस वाढत असल्याने या तापमानाची झळ मुक्या प्राण्यांना बसत आहे. उन्हाच्या पाऱ्यामुळे मुक्या प्राण्यांनाही उन्हाचा त्रास सहन करावा लागत आहे.

पंखा, कुलर, एसीच्या माध्यमातून माणूस गारवा मिळवण्याचा प्रयत्न करीत असतो, पण मुक्या प्राण्यांना पाण्यात गेल्याशिवाय गारवा मिळत नाही. यामुळे गुरे पाण्यात राहून आपले शरीर थंड करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे चित्र सध्या ग्रामीण भागात पहावयास मिळत आहे.

झाडाचा किंवा अन्य साधनाचा आधार घ्यावा लागतो.अशी स्थिती सध्या निर्माण झाली आहे. मग मुक्या प्राण्यांचा विचार कोण करतो. ग्रामीण भागामध्ये जनावरे बांधण्यासाठी झाडाच्या खाली बांधले जाते, परंतु सावली एका ठीकाणी स्थिर नसल्याने यांचा फटका मुक्या पाण्यांना बसत आहे. उन्हाच्या झळा असह्य होत असताना. आपल्या शरीराला थंडावा मिळवण्यासाठी या उद्देशाने पाण्याच्या आधार घेत असल्याचे दृश्य सध्या ग्रामीण भागत अनेक ठिकाणी आपल्याला पहावयास मिळत आहे.

# मुरूड येथील शिबिरात १५३ जणांनी केले रक्तदान



**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड महादेव कोळी समाज, महादेव कोळी समाज राजपुरी कोळीवाडा व डॉ. मंगेश पाटील यांचे श्रीयश हॉस्पिटल आणि शासकीय रक्तपेढी जिल्हा रुग्णालय अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने यांच्या माध्यमातून आपण गेली ११ वर्ष रक्तदान सोहळयाचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात १५३ जणांनी रक्तदान केले.

यावेळी नगराध्यक्ष आराधना दांडेकर, पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे, स्त्रीरोग तज्ज्ञ आणि प्रस्तुती तज्ज्ञ डॉ. मंगेश पाटील, जंजिरा मेडिकल असोसिएशन मुरुड अध्यक्ष संजय पाटील, डॉ.श्रीया पाटील, अंजली पाटील, नगरसेवक मनोज भगत, सागर कन्या मच्छीमार सहकारी सोसायटीचे चेअरमन मनोहर बैले, उपाध्यक्ष मनोहर मकु, नगरसेवक ॲड. रुपेश पाटील, चिंतामणी मकु, डॉ. दीपक गोसावी, डॉ. इप्सित पाटील, अभय पैर, नगरसेविका प्रिता चौलकर, नगरसेविका प्राजंली मकु, डॉ.मकबुल कोकाटे, उप पोलिस निरीक्षक अर्चना मोगरे, विजय गिदी, शैलेंद्र कुलाबकर, जितेंद्र मकु, राकेश कुलाबकर, विराज मकु, रामदास निशानदार, प्रयाग कुलाबकर, ऋषिकेश बैले, ऋतिक मकु, चेतन मकु, रुपाली बळी, राजेश्री गोंजी आर्दीसह मान्यवर रक्तदाते उपस्थित होते. यावेळी शहरातील महिला रक्तदात्या मैहजबिन जाबीर दखनी यांचा सन्मान नगराध्यक्ष आराधना दांडेकर यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

मुरुड-राजपुरी कोळीवाड्यातील तरुण तरुणी व महिला रक्तदान करतात हे महादेव कोळी समाजाचे फार मोठ यश असून या योगदान लाभल्यामुळे आज १५३ रक्तदान विक्रमी नोंद करू शकलो, असे प्रतिपादन माजी वैद्यकीय अधिकारी तथा स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. मंगेश पाटील यांनी केले.

नगराध्यक्ष आराधना दांडेकर यांनी एक स्तुत्य उपक्रम डॉ. मंगेश पाटील गेली अनेक वर्ष निस्वार्थी हेतूने राबवत आहेत.रक्तदान हे सर्वात महत्वाचे दान असून दिलेल्या रक्तामुळे दुसऱ्याचा जीव वाचतो हे खुप महत्वाचे आहे.या रक्तदान कार्यक्रमासाठी कोळी समाजाचे महत्वाचे योगदान लाभते ही खूप महत्वपूर्ण बाब असून पुण्यकर्म त्यांच्या हातून होत आहे याचा मला सार्थ अभिमान असल्याचे यावेळी नगराध्यक्ष यांनी आपले विचार व्यक्त केले.



**श्रीवर्धन : अवकाळी पावसाने जिल्ह्यात अनेक ठिकाणी हजेरी लावली. त्यामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला आहे. या पावसाचे बोर्लीपंचतन येथील टिपलेले छायाचित्र.** (छाया : अमेय नाझरे)

# ‘मतदारसंघातील प्रत्येक गावात मंदिरे व सामाजिक-धार्मिक स्थळे उभी राहावीत यासाठी कटिबद्ध’



**माणगाव : बातमीदार**

हनुमान जयंतीच्या पावन मुहूर्तावर निजामपूर विभागातील श्री क्षेत्र कोस्ते खुर्द, मौजे शिरसाड , या गावांमध्ये आयोजित श्री हनुमान मंदिरांच्या जिर्णोद्धार व लोकार्पण सोहळ्यांना मंत्री भरत गोगावले यांनी उपस्थित राहून भक्तिमय वातावरणात सहभाग नोंदवला.

माणगाव तालुक्यातील श्री क्षेत्र कोस्ते खुर्द येथे सालाबादप्रमाणे आयोजित श्री हनुमान जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त सत्यनारायण महापूजेत सहभागी होत त्यांनी हनुमंत रायाचे दर्शन घेतले. यावेळी ग्रामस्थांनी केलेल्या स्वागताबद्दल त्यांनी मनःपूर्वक आभार मानले. भगवान हनुमंताच्या कृपेने आणि ग्रामस्थांच्या एकजुटीने मंदिराचा जिर्णोद्धार यशस्वीरीत्या पूर्ण झाल्याचा त्यांनी विशेष उल्लेख केला. या सोहळ्यात धार्मिक परंपरा, संस्कृती आणि श्रद्धेचा सुंदर संगम अनुभवायला मिळाल्याचे त्यांनी सांगितले.

मौजे शिरसाड, निवाचीवाडी ,येथे श्री हनुमान मंदिराच्या जिर्णोद्धार व लोकार्पण सोहळ्याचा शुभारंभ मंत्री गोगावले यांच्या हस्ते संपन्न झाला. या पवित्र कार्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याची संधी मिळाल्याचा त्यांनी आनंद व्यक्त केला. ग्रामस्थांच्या सहकार्याने उभारलेले हे सुसज्ज व प्रशस्त मंदिर भविष्यात श्रद्धा, सामाजिक ऐक्य आणि प्रेरणेचे केंद्र ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी ग्रामस्थांशी संवाद साधताना मंत्री गोगावले यांनी मतदारसंघातील प्रत्येक गावात सुसज्ज मंदिरे व सामाजिक-धार्मिक स्थळे उभी राहावीत, यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे सांगितले.

या प्रसंगी जिल्हा परिषद सदस्य अविनाश नलावडे, पंचायत समिती सभापती विलास शिंदे, दत्तूशेठ पवार, मा. राजाभाऊ रणपिसे, मुंबईकर मंडळ, गुजरात मंडळ तसेच मोठ्या संख्येने महिला भगिनी, भाविक व ग्रामस्थ उपस्थित होते.

# माथेरानमध्ये वसंतोत्सवात पहिल्यांदाच गीतरामायण कार्यक्रम

**माथेरान : बातमीदार**

माथेरान ग्रामस्थ मंडळाने आयोजित केलेल्या वसंतोत्सवमध्ये प्रसिद्ध गायक श्रीधर फडके यांच्या गीत रामायणाने माथेरानमधील रसिक भारावून गेले. श्रीधर फडके यांच्या जादुई स्वरांनी शेकडो रसिकांना भुरळ पाडली.माथेरान मध्ये पहिल्यांदाच गीतरामायण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

माथेरानमध्ये गुढीपाडवा ते हनुमान जयंती या कालावधीत वसंतोत्सव साजरा केला जातो. सांस्कृतिक आणि आध्यात्मिक स्वरूपात गुढीपाडवा, श्रीराम नवमी, हनुमान जयंती असा हा उत्सव ग्रामस्थ मंडळ उत्सव मंडळाच्या वतीने साजरा होतो.माथेरान ग्रामस्थ उत्सव मंडळ अध्यक्ष प्रकाश सुतार, उपाध्यक्ष सुहासिनी शिंदे, सचिव चंद्रकांत जाधव, अनंता शेलार, गिरीश पवार, मंगेश मोरे, आदित्य बिल्लारे, कुलदीप जाधव, राजेश दळवी, सुरज कळंबे, शंतनू जमदाडे यांच्या आयोजनातून साजरा होत आहे. यावर्षी कुलदीप जाधव यांच्या माध्यमातून माथेरान ग्रामस्थ उत्सव मंडळाला सर्व पालखी सोहळ्यांसाठी सागाच्या लाकडाची पालखी भेट दिली आहे.हनुमान जयंतीच्या आदल्या दिवशी गीत रामायण हा भक्तिगीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.श्रीधर फडके यांचे जादुई स्वर ऐकण्यासाठी माथेरानकर जमले होते. सुरुवातीला माथेरान ग्रामस्थ मंडळाला सढळ हस्ते मदत करणाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.


## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **सुनिता यशवंत पाटील व इतर** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे : कळंबुसरे (५५३३३४)**
**(PU-ID : २५७५२५०८८६७), तालुका-उरण, जिल्हा-रायगड**

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| १११/५/क खाते क्रमांक : ६५२ | १ | ०.३३.०० पो.ख. ०.०३.०० | ७.२८ |
| | | **एकुण ०.३६.००** | |
| **एकुण क्षेत्र ०.३६.०० गुंठे** | | | |

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०२/०४/२०२६

**सही/-**
**ॲड. निलेश बा. झंजाड**
बी-१०४ सफायर सी.एच.एस., भूखंड क्रमांक ३३/३४, सेक्टर २२, कामोठे, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड - ४१०२०६
मो. क्र. ९९२०४७५८०१


# महादेवी मातेच्या यात्रेत भक्तांची मांदियाळी



**रोहा : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील भातसई येथील गळ टोचणी या उत्सवा निमित्ताने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पदस्पर्शाने पुनीत झालेल्या अवचित गडाच्या पायथ्याशी असलेल्या श्री महादेवी ( महादाई ) मातेच्या मंदिर परीसरात भक्तांचा मेळा भरला होता. होता.

सायंकाळी ५ सुमारास मंदिराकडे परीसरातील महादेवाच्या काठ्या पारंपारिक वाद्यांच्या गजरात वाजत गाजत मंदिराकडे आल्या. मंदिरात खालु बाजाच्या वाद्यवृंदावर ग्रामस्थांकडुन गळ टोचणी या धार्मिक कार्यक्रमाची तयारी सुरू केले.हा क्षण पहाण्यासाठी परीसरासह तालुका, जिल्हा व राज्यातुन भाविक मोठ्या प्रमाणात आले होते. मंदिरात मुख्य भाविकांसह अन्य भाविकांनी गळ टोचणी करण्यात येत होती. मंदिर ते गळ लावण्या मार्गावर फुलांच्या पाकळ्या पसरविण्यात आले होते. गळ टोचणी कार्यक्रमास सुरुवात झाल्यानंतर मुख्य गळ टोचलेल्या भगवान कृष्णा शेळके या भाविकांनी लाटेवर अधांतरी ठेवण्यात आले.

मातेचे भगत चिंतामणी खरीवले लाटेवर आरुढ झाले. श्री महादेवी ( महादाई ) मातेचा गजर करीत, हर हर महादेव चा गजर करत ६.१९ वाजताच्या सुमारास त्यांना २० ते २५ फुटी उंचावर असलेल्या लाटेवरून फिरविण्यात आले.

आदल्या दिवशी मंगळवारी महादेवी ( महादाई ) मातेची पालखी काढण्यात आली. परीसरातील गावातुन पालखी निमित्ताने घरे सजली होती. गावा गावात सडा रांगोळी काढण्यात आले होते.घरांना रंगरंगोठी करण्यात आले होते.आपल्या दारी पालखी आल्यानंतर भक्तांनी महादेवी ( महादाई ) मातेचे दर्शन घेतले.

# स्वदेश फाउंडेशनच्या माध्यमातून १५ युवकांना प्रशिक्षण व रोजगाराची संधी

**माणगाव : बातमीदार**

तालुक्यातील पाटणूस ग्रामपंचायत अंतर्गत फणसीदांड आदिवासी वाडीत २ महिन्यांचा गवंडी (मिस्त्री) कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीरीत्या पूर्ण झाला. या प्रशिक्षणात १५ युवकांनी सहभाग घेतला व बांधकाम क्षेत्राशी संबंधित प्रगत तांत्रिक कौशल्ये आत्मसात केली.

या प्रशिक्षणासाठी स्वदेश फाउंडेशनचे समन्वयक श्याम गिरकर आणि जितेंद्र म्हात्रे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. त्यांनी गावातील युवकांना एकत्र करून कौशल्य प्रशिक्षणाचे महत्त्व, स्वरोजगाराच्या संधी आणि उत्पन्नवाढीच्या शक्यता याबाबत मार्गदर्शन केले. त्यांच्या प्रेरणेमुळे १५ युवकांनी या गवंडी प्रशिक्षणात सहभाग घेतला आणि यशस्वीरीत्या पूर्ण केले.

या प्रशिक्षणाचे संचालन राजस्थानहून आलेले अनुभवी प्रशिक्षक प्रेम प्रकाश मेघवाल यांनी अत्यंत उत्तम पद्धतीने केले. त्यांनी थिअरी व प्रॅक्टिकलच्या माध्यमातून प्रशिक्षणार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रशिक्षणादरम्यान मटेरियल क्वालिटी तपासणी, सेफ्टी नियम, मोजमाप तंत्र, नकाशा (ड्रॉइंग) वाचन, कॉस्ट एस्टिमेशन आणि साइट मॅनेजमेंट यांसारख्या महत्त्वाच्या तांत्रिक बाबी शिकवण्यात आल्या.

प्रशिक्षणार्थी यशवंत, वसंत, बालकृष्ण, सिताराम, पांडुरंग आणि कौशिक यांनी या उपक्रमाला जीवन बदलणारी संधी असे म्हटले आहे. त्यांच्या मते, आता ते कुशल कारागीर म्हणून चांगले उत्पन्न मिळवू शकतात, रोजगारासाठी होणारे स्थलांतर कमी होईल आणि आपल्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती सुधारून मुलांना चांगले शिक्षण देऊ शकतील.




## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की **मौजे पोयंजे**, तहसील-पनवेल, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार **श्री. जयेश मेहता**, यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे :-

**शेतजमीनीचे वर्णन**

**मौजे पोयंजे**, तहसील पनवेल जिल्हा रायगड येथील मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील.

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र लावणी लायक हे.आर.प्रती | क्षेत्र पोटखराबा हे.आर.प्रती | क्षेत्र एकुण क्षेत्र हे.आर.प्रती | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|---|
| १० | १ | ०-२८-६० | ०-०२-०० | ०-३०-६० पैकी **०-२०-४०** | २.५० |

वरील शेतजमीन / मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन **१४** दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोष्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०२/०४/२०२६

**सही/-**
**ॲड. स्वप्निल व्यं. जाधव**
बी.ए.एल.एल.बी.

**कार्यालयीन पत्ता :** गाळा क्र. १५४ महानगरपालिका कॉम्प्लेक्स, तहसीलदार ऑफिसजवळ, दत्त झेरॉक्सच्या वरती, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६.
संपर्क:- ८८८८२७१७५९

# नवी मुंबई मनपाच्या मुख्यालयात पार्किंगचा गोंधळ

## सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिका मुख्यालय परिसरात सध्या पार्किंगचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून, चारचाकी वाहनांची वाढती गर्दी प्रशासनासाठी डोकेदुखी ठरत आहे. बेसमेंट पार्किंग पूर्णपणे भरलेले असतानाच मुख्यालयाच्या कंपाऊंडमध्ये तसेच प्रवेशद्वाराजवळही वाहनांची अव्यवस्थित पार्किंग होत असल्याचे चित्र दिसत आहे.

विशेष म्हणजे, बेसमेंटमध्ये जाणाऱ्या वळणावरदेखील वाहनांची पार्किंग केली जात असल्याने ये-जा करणाऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. मुख्यालयाबाहेरही मोठ्या प्रमाणावर वाहने उभी राहत असल्याने संपूर्ण परिसरात वाहतूक कोंडीसारखी परिस्थिती निर्माण



होते. परिणामी, नगरसेवकांनाही स्वतःची वाहने पार्क करण्यासाठी जागा मिळत नसल्याची तक्रार पुढे येत आहे.

या गंभीर समस्येकडे पालिका आयुक्त, उपआयुक्त तसेच इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून दुर्लक्ष होत असल्याचे चित्र असल्याची टीका स्थानिक स्तरावरून होत आहे. पार्किंग व्यवस्थापनासाठी कोणतीही ठोस योजना नसल्याने परिस्थिती दिवसेंदिवस अधिकच बिकट होत आहे. या संदर्भात जुईनगर येथील समाजसेवक श्रीधर मढवी यांनी उपाययोजना सुचवल्या आहेत.

मढवी म्हणाले की, बेसमेंटमध्ये केवळ नगरसेवक आणि उच्चपदस्थ अधिकाऱ्यांच्या वाहनांनाच परवानगी द्यावी. बंद पडलेली किंवा दीर्घकाळापासून न वापरण्यात येणारी वाहने तत्काळ हटवावी. माजी नगरसेवक आणि ठेकेदारांच्या वाहनांसाठी स्वतंत्र जागा निश्चित करावी, तर कर्मचाऱ्यांसाठी बाहेरील पार्किंगमध्ये स्टॅक पार्किंगची सुविधा उभारावी. तसेच, मुख्यालयात येणाऱ्या बाहेरील वाहनांसाठी पूर्वपरवानगीची अट लागू केल्यास पार्किंगवरील ताण कमी होऊ शकतो, असेही त्यांनी नमूद केले आहे.

दरम्यान, अनियंत्रित वाहन प्रवेशामुळे मुख्यालयातील सुरक्षा व्यवस्थेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. कोणत्याही प्रकारची कडक तपासणी किंवा नियंत्रण नसल्याने "आओ जावो घर तुम्हारा" अशी परिस्थिती निर्माण झाली असल्याची टीका करण्यात येत आहे. एखादी अनुचित घटना घडल्यावरच उपाययोजना करणे धोकादायक ठरू शकते, त्यामुळे प्रशासनाने तातडीने लक्ष देण्याची गरज श्रीधर मढवी यांनी म्हटले आहे.

# सभापती ममता म्हात्रे यांचा मातृ-शिशु आरोग्याबाबत प्रस्ताव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका सभागृहात झालेल्या बैठकीत महिला व बालकल्याण समितीच्या सभापती ममता प्रितम म्हात्रे यांनी मातृ-शिशु आरोग्याशी संबंधित अत्यंत महत्त्वाचा व दूरदृष्टी असलेला प्रस्ताव मांडला. या सभेला सन्माननीय महापौर, आयुक्त, उपमहापौर, सभागृह नेते, स्थायी समिती सभापती, विरोधी पक्षनेते तसेच सर्व नगरसेवक आणि पत्रकार उपस्थित होते.

सभागृहात विषय मांडताना सभापती ममता म्हात्रे यांनी पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील वाढती लोकसंख्या, दरवर्षी नोंद होणाऱ्या हजारो गरोदर माता आणि त्यापैकी मोठ्या प्रमाणावर असलेल्या 'हाय-रिस्क' मातांचा गंभीर मुद्दा उपस्थित केला. गरोदर माता आणि नवजात बालकांना वेळेवर व सुरक्षित रक्त उपलब्ध होणे ही अत्यंत महत्त्वाची गरज असून, सध्या त्यासाठी मोठ्या प्रमाणावर खाजगी रक्तपेढ्यांवर अवलंबून राहावे लागत असल्याचे त्यांनी नमूद केले.

या पार्श्वभूमीवर मातृ-शिशु मृत्यूदर कमी करण्यासाठी आणि सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार व विनामूल्य आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी खालील महत्त्वपूर्ण उपाययोजना त्यांनी सुचवल्या महानगरपालिकेची स्वतःची सुसज्ज व अत्याधुनिक मॉडेल ब्लड बँक उभारावी. १०८ रुग्णवाहिका सेवेच्या धर्तीवर 'ब्लड ऑन कॉल' सेवा सुरू करावी. हाय-रिस्क मातांसाठी डेटाबेस व ट्रॅकिंग सिस्टम विकसित करावी व पोषण योजना राबवावी.

महिला व बालकल्याण समितीमार्फत रक्तदान जनजागृती व महिला रक्तदान शिबिरे आयोजित करावीत. खासगी रुग्णालये व रक्तपेढ्यांचे ऑडिट करून पारदर्शकता सुनिश्चित करावी. या प्रस्तावामागील मुख्य उद्देश स्पष्ट करताना त्यांनी ठामपणे सांगितले की, कोणत्याही मातेला रक्तासाठी एकही रुपया मोजावा लागू नये आणि रक्ताच्या अभावामुळे एकही माता किंवा बालकाचा जीव धोक्यात येऊ नये, यावेळी त्यांनी पुढे सांगितले की, देशाचे पंतप्रधान आदरणीय



नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आरोग्य क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर सकारात्मक बदल होत असून, सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास या तत्वानुसार समाजातील शेवटच्या घटकापर्यंत आरोग्य सुविधा पोहोचवण्यावर भर दिला जात आहे.

भारतीय जनता पक्षाच्या विचारधारेनुसार महिला सक्षमीकरण, मातृ-शिशु संरक्षण आणि सर्वांसाठी आरोग्य सुविधा उपलब्ध करणे हे सर्वोच्च प्राधान्य आहे. पनवेल महानगरपालिका देखील याच धर्तीवर काम करत, मातृ-शिशु आरोग्य क्षेत्रात राज्यात आदर्श निर्माण करण्यासाठी पुढाकार घेईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

शेवटी, माता सुरक्षित तर कुटुंब सुरक्षित या भावनेतून मांडलेल्या या प्रस्तावास सभागृहाने एकमताने पाठिंबा द्यावा व प्रशासनाने तातडीने अंमलबजावणी सुरू करावी, अशी विनंती सभापती ममता म्हात्रे यांनी केली.

> **भारतीय जनता पक्षाच्या विचारधारेनुसार महिला व बालकल्याण आणि सर्वसामान्यांच्या आरोग्याला प्राधान्य देणे ही आपली भूमिका आहे. सभापती ममता प्रितम म्हात्रे यांनी प्रशासनाशी समन्वय साधत अत्यंत महत्त्वाचे आणि दूरदृष्टीचे विषय सभागृहात मांडले असून हा प्रस्ताव पनवेलच्या आरोग्य व्यवस्थेला अधिक सक्षम करणारा ठरेल.**
>
> **-प्रितम म्हात्रे, भाजप नेते**

# चांभार्ली ग्रामपंचायतीला राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

केंद्र शासनाच्या वतीने दिल्या जाणाऱ्या राष्ट्रीय पंचायत पुरस्कारांमध्ये,शाश्वत विकासाच्या नऊ संकल्पनांपैकी "सामाजिकदृष्ट्या सुरक्षित गाव" या संकल्पनेअंतर्गत ग्रुप ग्रामपंचायत चांभार्लीने देशात द्वितीय क्रमांक मिळवून नवा इतिहास रचला आहे.

या संकल्पनेत महाराष्ट्राला प्रथमच हा मानाचा पुरस्कार मिळाल्याने संपूर्ण राज्यभर ग्रामपंचायत चांभार्लीचे कौतुक होत आहे. महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, यशदाचे उपमहासंचालक



डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली, रायगड जिल्हा परिषदेच्या कार्यक्षम मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी विशाल तनपुरे, खालापूरचे गटविकास अधिकारी संदीप कराड, सहायक गटविकास अधिकारी कांबळे तसेच विस्ताराधिकारी विनोद चांदोरकर, शैलेश तांडेल, यांच्या विशेष प्रयत्नांमुळे ग्रामपंचायतीला हे यश मिळाले आहे.

चांभार्लीचे सरपंच प्रतिप पाटील, उपसरपंच स्वप्नील जांभळे, ग्रामपंचायत अधिकारी सीमा राठोड तसेच सर्व सदस्य, ग्रामपंचायत कर्मचारी, विविध विभागांचे अधिकारी आणि ग्रामस्थ यांच्या सहकार्याने सामाजिकदृष्ट्या सुरक्षित गाव या संकल्पनेतील उपक्रम राबविण्यात आले.

केंद्र शासनाच्या तपासणीसाठी आलेल्या पथकानेही गावाच्या कार्याचे कौतुक केले. या पुरस्कारासाठी महाराष्ट्र शासनाच्या वतीने राज्य समन्वयक अमीर शेख व श्रीधर कुलकर्णी यांनी सहकार्य केले.

# हरीश भोंडकर यांना पुरस्कार

**उरण : बातमीदार**

विष्णूदास भावे नाट्यगृह सभागृह वाशी नवी मुंबई येथे सारथी सेवा संस्था द्वारे सेंट मेरीज जे.एन.पी. शाळेचे शिक्षक हरीश धर्मा भोंडकर यांना महारक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला.

हा पुरस्कार रस्ता सुरक्षा अभियान, गणपती विसर्जन व इलेक्शन ड्युटी साठी विशेष पोलीस अधिकारी म्हणून ड्युटी केल्याबद्दल, अपघातग्रस्तांना मदत केल्याबद्दल, दरवर्षी रक्तदान केल्याबद्दल, शालेय विद्यार्थ्यांना उत्कृष्ट मार्च पास्ट संचलनाबरोबरच वाहतूक सुरक्षा व नागरी संरक्षण दल याबद्दल माहिती दिल्याबद्दल देण्यात आला.



या विशिष्ट पुरस्काराबद्दल त्यांच्या शाळेचे मुख्याध्यापक राजेश अल्फोंस यांनी देखील कौतुक केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. शिक्षक हरीश धर्मा भोंडकर यांना महारक्षक पुरस्कार मिळाल्याने त्यांच्यावर सर्वच स्तरातून शुभेच्छा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# राजिपच्या कालिवली येथील शाळेत शिक्षण परिषद



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

पाताळगंगा अतिरीक्त एमआयडीसी औद्योगिक परिसरातील कालिवली व बागेचीवडी या दोन शाळा मिळून संयुक्त शिक्षण परिषद घेण्यात आली.

या शिक्षण परिषदेची सुरुवात पळस्पे बिटाचे विस्तार अधिकारी व आपटे केंद्राचे केंद्रप्रमुख संजय केणी, सिप्ला कंपनीच्या सेवानिवृत्त उल्का धुरी मॅडम, गावचे ग्रामस्थ मनोज पाटील व सचिन पाटील यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले व ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले.

यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी स्वागतगीत व ईशस्तवन सादर केले. नंतर सिप्ला फौंडेशन व बायफ संस्था पुणे यांनी शाळेला intaractive बोर्ड दिला.त्याबद्दल धुरी मॅडम यांचा सन्मान करण्यात आला. या नंतर शाळेचे शाळेचे माजी विद्यार्थी जरी मरी आई वडापाव सेन्टर कालिवलीचे मालक मंगेश म्हात्रे, शुभांगी म्हात्रे हे विद्यार्थ्यांना वडापाव देऊन अन्नदानाचे पवित्र कार्य करतात म्हणून त्यांचा ही सन्मान करण्यात आला तसेच मनोज पाटील माजी उपसरपंच यांनी शाळेला परसबाग साठी तात्पुरती स्वरूपात जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचाही सन्मान करण्यात आला.

यानंतर इयत्ता ४.थी/७.वी शिष्यवृत्ती परीक्षेचे मार्गदर्शन प्रवीण तिळवे सर यांनी केले. यानंतर लाडीवली कातळाचीवाडी व गंगेची वाडी, आपटे मराठी व आपटे उर्दू या शाळेतील शिक्षकांनी शैक्षणिक साहित्य सादरीकरण केले.

यानंतर केंद्राचे केंद्रप्रमुख संजय केणी यांनी प्रशासकीय विषयांची माहिती सांगितली. त्यानंतर नाचन सरांनी आभार मानून शिक्षण परिषदेची सांगता केली.

# दिवाळेत पारंपरिक हनुमान जन्मोत्सव सोहळा

**नवी मुंबई : बातमीदार**

चैत्र पौर्णिमेनिमित्त दिवाळे कोळीवाड्यातील प्राचीन हनुमान मंदिरात पारंपरिक हनुमान जन्मोत्सव मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहात साजरा करण्यात आला. पहाटे महाभिषेक, हनुमान चालीसा पठण, रामनाम जप व आरती करून विधिवत पूजा करण्यात आली. सूर्योदयाच्या वेळी भाविकांच्या उपस्थितीत पुष्पवृष्टी करत पाळणा हलविण्यात आला. "संकटमोचन हनुमान की जय" आणि "जय श्रीराम"च्या घोषणांनी परिसर दुमदुमला आणि वातावरण भक्तिमय झाले.

या निमित्त मंदिराची फुलांनी आकर्षक सजावट, मूर्तीला शेंदूर लेपन तसेच विद्युत रोषणाई करण्यात आली होती. यावेळी



धार्मिक परंपरेच्या श्री संत ज्ञानेश्वर प्रासादिक भजन मंडळ, ज्ञानराज प्रासादिक भजन मंडळ, श्री पंढरीनाथ प्रासादिक महिला भजन मंडळ, श्री शिवशंकर प्रासादिक भजन मंडळ आणि शिव चिदंबरम भजन मंडळ या पारंपरिक भजनांनी उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले. तसेच आनंद सिंग यांचे सुंदरकांड आणि ब्रास बॅण्ड पथकांच्या सादरीकरणाने विविध धार्मिक कार्यक्रमांमुळे दिवसभर उत्सवाची रंगत कायम राहिली.

संध्याकाळी ७ वाजण्याच्या सुमारास हनुमान मंदिरापासून संपूर्ण गावातून पालखी मिरवणूक काढण्यात आली. पारंपरिक वेशभूषेत सहभागी झालेल्या भाविकांनी मिरवणुकीत उत्साहाने सहभाग घेतला. ढोल-ताशांच्या गजरात व हरी ओम साई भजन मंडळाच्या जयघोषात ही मिरवणूक पार पडली. यावेळी, गावातील ज्येष्ठ नागरिक, महिला व युवकांचा उत्स्फूर्त सहभाग विशेष लक्षवेधी ठरला.

दरम्यान, भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था हनुमान सेवा संस्था व पांडुरंग पाटील यांच्यासह समस्त दिवाळे ग्रामस्थ मंडळ यांच्यावतीने करण्यात आली होती. अभिषेक व पूजेचे मानकरी म्हणून पदा फकीर आणि बामण वळकरी यांना देण्यात आला असल्याचे गावचे पाटील परशुराम पाटील यांनी यावेळी सांगितले.

# रस्ता सुरक्षा चॅम्पियन पुरस्काराने शिक्षक विलास पाटील सन्मानित

**कळंबोली : बातमीदार**

शैक्षणिक ज्ञानदानाच्या कार्यास सोबतच रस्ता सुरक्षेचे धडे ही विद्यार्थ्यांना देऊन त्यांना सहज नागरिक बनवण्यात सातत्याने पुढाकार घेणाऱ्या कळंबोलीतील सुधागड विद्या संकुलातील सहाय्यक क्रीडा शिक्षक व आरएसपी महाराष्ट्र राज्याचे डेप्युटी कमांडट विलास डी पाटील यांना पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

विष्णुदास भावे नाट्य गृह येथे सारथी सुरक्षा संस्था मार्फत रस्ता सुरक्षा अभियानात विशेष कामगिरी बजावणाऱ्या नामवंत व्यक्तींचा हिंदी चित्रपट सिनेमा अभिनेता



शेहजात खान, आर टी ओ महाराष्ट्र राज्य प्रमुख अधिकारी भरत कळमकर नवी मुंबईचे आरटीओ पोलीस अधिकारी अग्निशमन दलाचे व इतर विविध क्षेत्रातील मान्यवर यांच्या उपस्थितीत अनेक कर्तुत्ववान व्यक्तींचा सन्मान करण्यात आला. त्यामध्ये सुधागड हायस्कूल कळंबोलीचे क्रीडा शिक्षक व आर एस पी महाराष्ट्र राज्याचे डेप्युटी कमांडट विलास डी पाटील यांचाही विशेष सन्मान करण्यात आला.

चॅम्पियन्स पुरस्काराने सन्मानित केल्याबद्दल विलास पाटील यांचे अभिनंदन होत आहे.

# याल तर हसाल नाटकाचे ११२० प्रयोग पूर्ण

**नवी मुंबई : बातमीदार**

आगरी कोळी भाषेतील रंगभूमीने एक ऐतिहासिक टप्पा गाठला असून हास्यप्रबोधनकार संजीवन म्हात्रे लिखित व दिग्दर्शित याल तर हसाल या लोकप्रिय नाटकाने नुकताच एक हजार १२० प्रयोगांचा दिमाखदार टप्पा पूर्ण केला आहे. ग्रामीण आणि शहरी प्रेक्षकांना एकाच धाग्यात बांधणाऱ्या या नाटकाने केवळ मनोरंजनच केले नाही, तर आगरी कोळी भाषेची समृद्धी, विनोदबुद्धी आणि सांस्कृतिक ओळख महाराष्ट्रभर पोहोचवली आहे.

या याल तर हसाल हे नाव जितके साधे, तितकाच त्यामागचा आशय खोल आहे. दैनंदिन जीवनातील घडामोडी, माणसांचे स्वभाव, सामाजिक विसंगती, कुटुंबव्यवस्था, गावकुसाबाहेरील बदलते वास्तव हे सारे विषय नाटकात खळखळून



हसवत, पण अंतर्मुख करायला लावणाऱ्या शैलीत मांडले आहेत. आगरी कोळी भाषेतील सहज, खट्याळ संवाद आणि प्रसंगनिष्ठ विनोद हे या नाटकाचे सर्वात मोठे बलस्थान ठरले आहे.

विशेष म्हणजे नाटकाच्या पहिल्या प्रयोगापासूनच प्रेक्षकांनी 'याल तर हसाल' ला उचलून धरले. मुंबई, ठाणे, रायगड, पालघरसह राज्याच्या विविध भागांतच नव्हे तर ग्रामीण भागातही या नाटकाचे प्रयोग हाऊसफुल्ल झाले. १ हजार १२० प्रयोगांचा टप्पा गाठणे हे केवळ आकड्यांचे यश नसून, प्रेक्षकांनी दिलेल्या विश्वासाचे आणि प्रेमाचे प्रतीक असल्याचे मानले जात आहे.

> **रंगभूमीवर ठसा**
>
> आजच्या डिजिटल युगातही नाटकाला मिळणारा हा प्रतिसाद रंगभूमीसाठी आशादायी आहे. १ हजार १२० प्रयोगांचा टप्पा पूर्ण करत 'याल तर हसाल' ने आगरी कोळी भाषेतील नाटकांनाच नव्हे, तर एकूणच मराठी रंगभूमीला नवी ऊर्जा दिली आहे. हसवता-हसवता समाजाशी नाळ जोडणारे 'याल तर हसाल' हे नाटक पुढील अनेक वर्षे रंगभूमीवर आपला ठसा उमटवत राहील, असा विश्वास संजीवन म्हात्रे यांनी यावेळी व्यक्त केला.

# नेरूळमध्ये हनुमान जयंती उत्साहात साजरी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नेरूळ येथील गंगोत्री सोसायटीसह विविध धार्मिक स्थळी मोठ्या भक्तिभावाने हनुमान जयंती साजरी करण्यात आली.

नेरूळ सेक्टर १८ येथील गंगोत्री गृहनिर्माण सोसायटीत सालाबादप्रमाणे हनुमान मंदिरामध्ये सकाळी विधिवत अभिषेक करण्यात आला. त्यानंतर महिला भगिनींनी हनुमानाचा पाळणा गात हनुमानाचा जन्मोत्सव मोठ्या



उत्साहात साजरा करण्यात आला. त्यानंतर सत्यनारायणाची पूजा, महाआरती करण्यात आली. यावेळी माजी नगरसेवक काशिनाथ पवार, भावना खिस्ते, वंदना शिंदे, कविता पाटील, शोभा औटी, सुरेखा सरंबळे, रामदास शिंदे, गणेश मिस्त्री, संजय धनावडे, अनिल औटी आदीसह शेकडो भाविकांनी हनुमामानाचे मनोभावे दर्शन घेतले.

नेरूळ सेक्टर १० येथील पंचपरमेश्वर मंदिरात हनुमान जयंती मोठ्या भक्तिभावाने साजरी करण्यात आली. यावेळी अध्यक्ष नवनाथ चव्हाण, हनुमंत शेटे, बापू खैरे यासह शेकडो भक्तांनी हनुमानाची मनोभावे पूजा केली. सारसोळे गावात सालाबाद प्रमाणे यंदाही पारंपरिक पद्धतीने हनुमानाची पूजा अभिषेक उत्सव साजरा करण्यात आला.



**उरण : कोप्रोली गावातील हनुमान मंदिरात हनुमान जन्मोत्सव भक्तिभावात झाला. या निमित्ताने जन्माचा पाळणा गाणाऱ्या महिला.**

# वाढत्या उन्हात पशुधनाची काळजी घ्या

## रायगड जिल्हा पशुसंवर्धन विभागाचे पशुपालकांना आवाहन | उष्माघातापासून बचावासाठी मार्गदर्शक सूचना जारी

**पाली : प्रतिनिधी**

राज्यात विशेषतः कोकण किनारपट्टीला आणि रायगड मध्ये पारा वाढू लागल्याने माणसांप्रमाणेच पशुपक्षी आणि जनावरांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.

उन्हाच्या तीव्र झळांमुळे पशुधनाची वाताहत होऊ नये यासाठी रायगड जिल्हा पशुसंवर्धन विभागाने कंबर कसली असून पशुपालकांसाठी विशेष मार्गदर्शक सूचना आणि उपाययोजना जारी केल्या आहेत. पशुपालकांनी आपल्या जनावरांची विशेष काळजी घ्यावी, असे आवाहन रायगड जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. सचिन देशपांडे यांनी केले आहे.

उन्हाळ्याच्या दिवसांत उष्णतेच्या ताणामुळे जनावरांची भूक मंदावते, परिणामी दुग्ध उत्पादनावर मोठा परिणाम होतो. विशेषतः म्हशींना त्यांच्या काळ्या रंगामुळे आणि शरीरातील कमी घामग्रंथींमुळे गायींच्या तुलनेत अधिक त्रास होतो. हा धोका टाळण्यासाठी जनावरांना थंड वातावरणात चारा देणे, युरिया प्रक्रिया केलेला चारा आणि मुरघासचा वापर करणे फायदेशीर ठरते. तसेच, जनावरांचे नियमित लसीकरण (लाळ्या खुरकुत, पीपीआर, घटसर्प, फऱ्या इ.) आणि जंतनाशक औषधोपचार पूर्ण करून घेण्याचे निर्देश विभागाने दिले आहेत.



**या उपाययोजना ठरणार प्रभावी...**


गोठ्याची उंची जास्त असावी. छप्पराला पांढरा चुना लावावा किंवा त्यावर पालापाचोळा टाकावा. गोठ्याभोवती ओले बारदाणे किंवा शेडनेट लावावेत. जनावरांना मुबलक थंड पाणी द्यावे. गोठ्यात हवा खेळती राहण्यासाठी पंखे किंवा फॉगर्सचा वापर करावा. बैलांकडून शेतीची कामे केवळ सकाळी किंवा संध्याकाळी करून घ्यावीत. भर उन्हात मशागत टाळावी. गोठ्याचा परिसर थंड ठेवण्यासाठी सभोवताली सावली देणारी झाडे लावावीत.

जनावरांच्या आहारात मिठाचा वापर वाढवावा आणि पिण्याच्या पाण्यात इलेक्ट्रोलाइट्स मिसळावेत. दुधाळ जनावरांना संतुलित पशुखाद्यासोबत खनिज मिश्रणे द्यावीत. पक्ष्यांच्या बाबतीत त्यांच्या खुराड्यांमध्ये तापमान नियंत्रक व्यवस्था असणे आवश्यक आहे. तसेच, मृत जनावरांची विल्हेवाट लावताना ती सार्वजनिक ठिकाणे किंवा जलसाठ्यांपासून दूर लावावी, अशा सूचनाही देण्यात आल्या आहेत.

> **उष्माघातापासून होणारे पशुधानाचे नुकसान टाळण्यासाठी रायगड पशुसंवर्धन विभाग सज्ज आहे. पशुसंवर्धन विभागाने याबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. कृपया त्याची पशुपालकांनी अंमलबजावणी करावी, जेणेकरून उष्माघात टाळता येईल. तरीसुद्धा जिल्ह्यात कोणतीही अशी बाब आढळून आल्यास तत्काळ नजीकच्या तालुका लघु पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालय किंवा पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी१/श्रेणी २ यांना संपर्क करून बाधित जनावरांवर उपचार करून घ्यावेत.**
> **-डॉ. सचिन देशपांडे,**
> जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, रायगड

# जवानाच्या संशयास्पद मृत्यूची चौकशी करण्याची मागणी

**पोलादपूर : प्रतिनिधी**



तळेगाव दाभाडे येथील लक्ष्मीबाग कॉलनीतील रहिवासी आणि मागील २४ वर्षांपासून केंद्रीय राखीव पोलीस दलामध्ये सेवा बजावणारे जवान प्रशांत प्रकाश कदम (वय ४२) यांचा अपघातात मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. पोलादपूर तालुक्यातील कणगुले हे जवानाचे मूळगाव असून त्याच्या पत्नीसह आई-वडिलांनी जवानाच्या मृत्यूच्या सखोल चौकशीची मागणी पोलिसांकडे केली आहे.

पोलिसांकडे मृत्यूच्या चौकशीची मागणी करणाऱ्या निवेदनामध्ये प्रशांत कदम या जवानाचा केवळ अपघात नसून एक नियोजनबध्द घातपात असल्याचा खळबळजनक आरोप कुटुंबियांनी केला. या घटनेमुळे तळेगाव दाभाडे पासून पोलादपूर तालुक्यात हळहळ व्यक्त होत असून पोलीस तपासाबाबत साशंकता व्यक्त होत आहे.

२७ मार्च रोजी संध्याकाळी प्रशांत कदम हे आपल्या घरून गुजरात राज्यातील गांधीनगर येथे डयुटीवर जाण्यासाठी निघाले असता लोणावळ्यापर्यंत पोहोचल्याचा त्यांनी कुटूंबियांना फोन केला. मात्र, त्यानंतर अचानक त्यांचा संपर्क तुटला आणि त्यांचा मोबाईलही बंद झाला. २७ मार्चला गांधीनगर कार्यालयातून ते डयुटीवर पोहोचले नसल्याचा निरोप आला आणि त्यांच्या कुटूंबियांना अचानक उभ्या राहिलेल्या प्रसंगाने धक्का बसला. यानंतर सीआरपीएफ जवान प्रशांत कदम यांच्या शोधकार्यास सुरूवात करण्यात आली.

३० मार्च रोजी एका मित्राकडून मिळालेल्या माहितीनुसार २७ मार्चलाच रायगड जिल्ह्यामधील कर्जत तालुक्यातील सोमाटणे फाटा येथील हॉटेल 'अंगण'समोर प्रशांत कदम हे जखमी अवस्थेत रस्त्याच्या बाजूला आढळले होते. त्यांना रुग्णालयात नेले असता तेथील डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले होते.

या घटनेनंतर सीआरपीएफ प्रशांत कदम यांचे पार्थिव त्यांच्या तळेगाव दाभाडे येथील घरी आणण्यात आले. आप्तपरिवार आणि ग्रामस्थांच्या उपस्थितीत पोलीस दलाने हवेत बंदुकीच्या फैरी झाडून त्यांना शासकीय इतमामात अखेरची सलामी दिली. जवानाला निरोप देताना संपूर्ण गाव शोकसागरात बुडाले, मात्र अखेरच्या निरोपानंतर मृत जवान प्रशांत कदम यांच्या संशयास्पद मृत्यूबाबत न्यायाची मागणी जोर धरू लागली.



**तळा : आमदार निरंजन डावखरे यांच्या निधीतून तळा जिल्हा परिषद शाळेला संगणक संच भेट देण्यात आला. यावेळी भाजप तालुकाध्यक्ष ॲड. निलेश रातवडकर, शहराध्यक्ष राकेश कासार, मोरेश्वर गोरीवले, युवक शहर अध्यक्ष सुयोग बारटक्के, मुख्याध्यापिका सुप्रिया जामकर, सहशिक्षिका मित्तल मुळे आदी उपस्थित होते.**

# खोपोलीत गोवंशीय मांस जप्त; चौघे ताब्यात

**खालापूर** : मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील फुडमॉल परिसरात नादुरुस्त झालेल्या पिकअप वाहनांची कठड्याला धडक झाली. बंदोबस्तासाठी असलेल्या पोलिसांनी याचा तपास केला असता यामध्ये गोवंश कापून अवयवांचे तुकड्यां तुकड्यांमध्ये अवशेष आढळले.

चौकशीत खोपोली पोलीस ठाण्यात आणले असता १६०० किलो वजनाचे गोवंश अंदाजे किंमत एक लाख ६८ हजार रुपये असल्याची बाब उघड झाली. खोपोली पोलिसांनी वाहतूक करणारे वाहन व त्याला प्रोटेक्शन करण्यासाठी आणखी दोन वाहने अशा ऐवजसह चार जणांना ताब्यात घेतले आहे.

## निवडक



### रोह्यात शिवसेनेची आढावा बैठक

**रोहा** : शिवसेनेची रोहा शहर व तालुक्याची सभा रोहा शासकीय विश्रामगृह येथे जिल्हाध्यक्ष राजा केणी यांच्या उपस्थितीत बैठक झाली. यावेळी जिल्हा परिषद सदस्य सुमीत काते, उर्वशी वाडकर, पं.स.सदस्य वर्षा देशमुख, उद्देश वाडकर, माजी नगराध्यक्ष लालता प्रसाद कुशवाह, नगरसेविका सुप्रिया जाधव, विकास पाटील, संदेश मोरे, उस्मान रोहेकर, मोतीराम गीजे, प्रविण दाभाडे, सुरेश महाबळे, रामचंद्र म्हात्रे, विजय बोरकर, गहीनीनाथ कटोरी, शैलेश सकपाळ, प्रकाश कोळी, अशिष स्वामी, निलेश वारंगे, मंगेश रावकर, मदन गीजे उपस्थित होते.

### श्रीकांत गणगणे यांना सेवानिरोप

**धाटाव** : एमएसआरडीसीचे कार्यकारी अभियंता श्रीकांत गणगणे हे प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाले असून, त्यांच्या निरोप



समारंभात भावनांचा महापूर लोटला होता. १९९६ च्या 'एमपीएससी' बॅचचे अधिकारी असलेल्या श्रीकांत गणगणे यांनी आपल्या कारकिर्दीची सुरुवात नॅशनल हायवेपासून केली. मुंबई-गोवा महामार्गाच्या महत्वाकांक्षी प्रकल्पासाठी जमीनी संपादन आणि व्हॅल्यूएशनचे अत्यंत किचकट व जबाबदारीचे काम त्यांनी लिलया पेलले. सार्वजनिक बांधकाम विभागासाठी उपविभागीय अभियंता म्हणून सेवा देताना रायगडच्या दुर्गम वाड्या-वस्त्यांपासून ते शहरांच्या झगमगाटापर्यंत त्यांनी विकासकामांची मोहोर उमटवली. विशेषतः आपत्ती व्यवस्थापनाच्या काळात गणगणे यांनी 'फिल्ड'वर उतरून दिलेले योगदान जिल्ह्यासाठी मोलाचे ठरले आहे.

### खोपोलीत महावीर जयंती



**खोपोली** : खोपोलीत जैन बांधवांनी महावीर जयंती उत्साहात साजरी केली यानिमित्ताने खोपोली बाजारपेठ मुख्य रस्त्यावर रॅलीचे आयोजन करण्यात आले होते या रॅलीत नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे, उपनगराध्यक्ष विक्रम साबळे, शिवसेना नगरसेवक दिनेश थोरवे, समीर मसूरकर यासह दिलीप पोरवाल, सोनू शेलार, जैन साधू व मोठ्या प्रमाणात जैन बांधव उपस्थित होते.

### गजानन पाटील यांना सेवानिरोप

**माणगाव** : छत्रपती शिक्षण मंडळ, कल्याण संचलित सरस्वती विद्या मंदिर, वडघर-मुद्रे येथे विद्यालयाचे मुख्याध्यापक गजानन विठ्ठल पाटील यांच्या २८ वर्षांच्या शिक्षण क्षेत्रातील सेवापूर्ती निमित्त आयोजित सदिच्छा समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाचे अध्यक्ष सुनील पाटील, बाबाजी रिकामे, हनुमान तुकाराम म्हात्रे, दीपक महादेव ठाकूर, विनायक पोषा पाटील, सुनिल दामोदर म्हात्रे, दिनेश पाटील आदी मान्यवरांच्या हस्ते कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने झाली.



# रेवदंड्यातील अवजड वाहतूक बायपासमार्गे वळवण्याची मागणी

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा बाजारपेठेतील नित्याच्या वाहतुक कोंडीने ग्रामस्थ व प्रवासीवर्ग त्रस्त झाले असून अजवड वाहतुक ही रेवदंडा बायपास मार्गे वळवावी अशी मागणी ग्रामस्थ व प्रवासीवर्ग करत आहेत.

रेवदंडा बाजारपेठतील रस्ता अरूंद असल्याने दोन अवजड वाहने पास होत असताना, वाहन चालकांना जिकीरीचे असते, शिवाय मुरूड पर्यटन क्षेत्र म्हणून प्रसिध्दीस आल्याने रेवदंडा बाजारपेठेतील वाहतुकीत वाढ झाली आहे. रेवदंडा बाजारपेठेत

### वाहनांच्या सतत कोंडीने नागरिक त्रस्त

मुरूड व अलिबागकडे जा-ये करणाऱ्या लहान मोठया वाहनांची संख्या वाढली असून मिनिटागणीत वाहतुक येथून सुरू असते. रेवदंडा बाजारपेठेतील रस्ता अरूंद व काही ठिकाणी वळणाचा असल्याने नित्याने वाहतुक कोंडी येथे होते.

रेवदंडा बाजारपेठेत अरूंद रस्ताने दोन अवजड वाहने पास होताना, फारच त्रासदायक असते. शिवाय नव्याने प्रवास करत असलेल्या वाहनचालकाला रस्ताची पुर्ण माहिती नसल्याने, दोन वाहने पास होताना खुप गडबड उडते, परिणामी अवजड वाहने पास होताना, वेळ लागत असल्याने अवजड वाहनाच्या मागेपूढे वाहनाची लाईन लागून वाहतुक कोंडी निर्माण होते.

या वाहतुक कोंडीने वेळेचा अपव्यय निर्माण होतो. रेवदंडा बाजारपेठेत रस्ता रूंदीकरण करणे गरजेचे आहे, मात्र रेवदंडा बायपास रस्ता सुरळीत असल्याने चौलनाका येथून तसेच रेवदंडा मोठे बंदर येथून अवजड वाहने या मार्गी वळवावी, अशी मागणी प्रवासीवर्ग तसेच ग्रामस्थ करीत आहेत.

# पोलादपुरात अवकाळी पावसाने तापमानात वाढ

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून तापमान वाढत असताना सोमवारी दुपारनंतर तालुक्यातील लहुळसे गावासह परिसरामध्ये अवकाळी वादळी पावसाने हजेरी लावली. यामुळे पोलादपूर तालुक्याच्या तापमानामध्ये वाढ झाल्याचे दिसून आले आहे.

पोलादपूर तालुक्यातील देवळे ग्रुपग्रामपंचायत हद्दीतील निसर्गरम्य लहुळसे गावामध्ये ग्रामीण पर्यटनाला चालना देण्यासाठी अनेक उपक्रम गेल्या काही वर्षांपासून हाती घेण्यात आले आहेत. मात्र, गेल्या चार-पाच दिवसांमध्ये या परिसरामध्ये अंगाची काहिली होण्याइतपत वातावरणात प्रचंड उष्मा निर्माण झाला. काल सोमवार, ३० मार्च रोजी पावसानेही झोडपण्यास सुरूवात केली.

या लहुळसे भागातील तापमान अवकाळी वादळी पावसामुळे काही काळ गार पडले असताना तालुक्यातील अन्य भागात मात्र, तापमानवाढीचा परिणाम दिसून आला. पोलादपूर तालुक्यात दुपारी जास्तीतजास्त ३९ अंश सेल्सियस तापमान वाढ झाल्याचे दिसून आले.

# म्हसळा पंचायत समिती सभापतीपदी बबन मनवे

**म्हसळा : प्रतिनिधी**

म्हसळा पंचायत समितीच्या सभापती पदाच्या निवडणुकीत बबन श्रीपद मनवे यांची बिनविरोध निवड झाली आहे.

पंचायत समितीचया सभागृहात तहसीलदार तथा प्राधिकृत अधिकारी सचिन खाडे यांच्या अध्यक्षतेखाली विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. सभापती पदासाठी दाखल झालेल्या अर्जांची छाननी करण्यात आली असता बबन मनवे यांचा एकमेव अर्ज वैध ठरल्याने त्यांची बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली.या निवडणुकीत सर्वसाधारण प्रवर्गातून बबन श्रीपद



मनवे, लव अंबाजी म्हात्रे, समृद्धी संदीप चाचले हे सदस्य निवडून आले असून, नामाप्र राखीव प्रवर्गातून श्रीमती प्रियंका प्रसन्न निंबरे यांची निवड झाली आहे.

म्हसळा पंचायत समितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे चारही सदस्य असल्याने आणि त्यांच्यात एकमत झाल्यामुळे मनवे यांची निवड पूर्वनिश्चित मानली जात होती. संपूर्ण निवडणूक प्रक्रिया शांततेत पार पडली. नवनिर्वाचित सभापती बबन मनवे यांनी सर्व सदस्यांचे आभार मानत, तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी प्रामाणिकपणे काम करण्याचा संकल्प व्यक्त केला.

या निवडीमुळे म्हसळा तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसची ताकद पुन्हा अधोरेखित झाली असून आगामी काळात विकासकामांना चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सुभाष केकाणे, तालुका अध्यक्ष समीर बनकर, शाहीद उकये, जि.प. सदस्य अनिल बसवत, महेश घोले, संतोष सावंत तसेच पंचायत समिती सदस्य लव अंबाजी म्हात्रे, समृद्धी चाचले, प्रियंका निंबरे आदी मान्यवरानी मनवे यांना शुभेच्छा दिल्या.

# संस्कृती संवर्धन प्रतिष्ठानचा पुरस्कार वितरण सोहळा



**कर्जत : प्रतिनिधी**

अभिनव ज्ञानमंदिर कनिष्ठ महाविद्यालय कर्जत येथे संस्कृती संवर्धन प्रतिष्ठानच्या नैतिक मूल्यशिक्षण अभ्यासक्रम अंतर्गत घेण्यात आल्या होत्या. कर्जत विभाग पुरस्कार बक्षीस वितरण समारंभ सोहळा झाला.

कर्जत विभागातून इयत्ता चौथी ते आठवी वर्ग सहभागी असुन एकूण बावीस शाळा मधील २००० विद्यार्थी या परीक्षेत बसले होते. त्यातील प्रथम क्रमांक ६५ विजेते विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. संस्कार हे एका पिढीतून दुसऱ्या पिढीत संक्रमित व्हावे. यासाठी प्रतिष्ठानचे रोवलेले हे बीज आज वटवृक्षात रूपांतरित झाले असून त्याचे कार्य मोठ्या प्रमाणात विस्तारित होत आहे. या कार्यक्रमात सहभागी मुख्याध्यापक, शिक्षक कार्यकर्ते, पालक, आणि विद्यार्थी उपस्थिती होती. सांस्कृतिक कार्यक्रमाचे सुंदर सादरीकरण शिशु मंदिर कडाव शाळेच्या इयत्ता ६वी व ७वीच्या वर्गातील विद्यार्थिनींनी सांस्कृतिक कार्यक्रमाला सुरूवात केली. त्यानंतर दीपप्रज्वलन करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष अ. ज्ञा. मंदिर कनिष्ठ महाविद्यालय कर्जतचे सहसचिव अनिल जोशी तसेच संस्थापक विश्वस्त संस्कृती संवर्धन प्रतिष्ठान मोहन सालेकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. प्रमुख अतिथी अनुराधा भाटकर, साईनाथ श्रीखंडे उपस्थित होते.

# अंजुमन कॉलेजमध्ये पदवीदान समारंभ

**मुरूड : प्रतिनिधी**

प्राचार्य डॉ. साजिद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली शैक्षणिक वर्ष २०२४२५चा पदवीदान समारंभ व शैक्षणिक वर्ष २०२५२६चा वार्षिक बक्षीस वितरण समारंभ बुधवार, १ एप्रिल २०२६ रोजी महाविद्यालयाच्या प्रांगणात उत्साहपूर्ण वातावरणात झाला.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संस्थेचे सचिव हिफझुर्रहमान नझिरी यांनी भूषविले. या समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून नगरपंचायत म्हसळाचे माजी नगराध्यक्ष अशल असलम कादिरी उपस्थित होते. तसेच सन्माननीय पाहुणे म्हणून फजल मेहमूद जमादार, हबीब खोत, कैसर दणदणे, नसिर मिठागरे, अझहर डावरे, नईम कादरी व जुनेद खान यांनी उपस्थिती लावली.

यावेळी शैक्षणिक, सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या १२० हुन अधिक गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच जवळजवळ ७० विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमात महाविद्यालयाचे चेअरमन जैनुद्दीन कादिरी, फजल मेहमूद जमादार,महाविद्यालय विकास समिती सदस्य तौसिफ़ फत्ते, सैफुल्लाह फिरफिरे आदी मान्यवरांनी विद्यार्थ्यांना परिश्रम, शिस्त आणि प्रामाणिकपणाच्या बळावर उज्वल भवितव्य घडविण्याचा संदेश दिला.

# वातावरणीय बदलाने आंबा, काजूला धोका

## पिकावर परिणामामुळे शेतकरी हतबल

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यात गेल्या दोन तीन वर्षांपासून होत असलेल्या वातावरणीय बदलाचा फटका आंबा, काजू इत्यादी पिकांना बसत आहे. गेल्या दोन दिवसांपासून ढगाळ वातावरण असल्याने आंबा, काजू पिकाला धोका निर्माण झाला असून आंबा पिकही यावर्षी कमी होईल असा अंदाज शेतकरी वर्गातून केला जात आहे.



या वर्षात अनेक वेळा वातावरण बदलाने मोहर व फुल गळण्याचा धोका निर्माण झाला होता. यामुळे काही भागात मोहर गळला ही आहे. दोन दिवस ढगाळ वातावरण आहे कधीही पाऊस पडण्याचा धोका असल्याने जर का पाऊस पडला अथवा वातावरण असेच राहिले तर काही प्रमाणात आललेले आंबे, काजू गळून जाऊन मोठ्याप्रमाणात शेतकऱ्यांना नुकसानीला सामोरे जावे लागेल. वातावरणीय बदलांमुळे आंबा पिक तर लांबला आहेच त्याचबरोबर आंबा पिकांमध्ये घट झाल्याचे चित्र पहावयास मिळत. वातावरणीय बदलांमुळे शेतकरी वर्ग चिंतेत असल्याचे पहावयास मिळाले.

# दिल्ली कॅपिटल्सचा दमदार विजय



**लखनऊ : वृत्तसंस्था**

समीर रिझवीने केलेल्या धडाकेबाज नाबाद अर्धशतकाच्या जोरावर दिल्ली कॅपिटल्सने आयपीएल स्पर्धेत बुधवारी लखनऊ सुपर जायंट्सस्वर सहा गडी राखून दणदणीत विजय मिळवला. दिल्लीच्या अष्टपैलू कामगिरीसमोर लखनऊचे आव्हान फिके पडले. या लढतीत दिल्लीने लखनऊला १८.४ षटकांत सर्वबाद १४१ धावांवर रोखल्यानंतर १७.१ षटकांतच चार गड्यांच्या बदल्यात विजयाचे लक्ष्य गाठले.

विजयी लक्ष्याचा पाठलाग करताना दिल्लीची सुरुवात खराब झाली होती. चौथ्या षटकात अवघ्या २१ धावांवर दोन गडी बाद झाले असताना समीर रिझवी मैदानात उतरला आणि त्याने ४७ चेंडूंत ७० धावांची नाबाद खेळी साकारत विजय खेचून आणला. या खेळीत त्याने पाच चौकार आणि चार उत्तुंग षटकार लगावले. रिझवीच्या या खेळीमुळे दिल्लीने १४२ धावांचे लक्ष्य १७.१ षटकांत चार गड्यांच्या मोबदल्यात १४५ धावा करत सहज पूर्ण केले.

तत्पूर्वी, एन्गिडी व टी. नटराजन यांनी प्रत्येकी तीन गडी बाद केल्यानंतर दिल्ली कॅपिटल्सने लखनऊ सुपर जायंटस्चा डाव १८.४ षटकांत केवळ १४१ धावांमध्येच गुंडाळण्यात यश मिळवले. कुलदीप यादवनेदेखील दोन बळी घेत यात मोलाचा वाटा उचलला. लखनऊतर्फे अब्दुलने समदने सर्वाधिक ३६, तर मिशेल मार्शने ३५ धावा केल्या. अन्य फलंदाजांनी मात्र सपशेल निराशा केली.

प्रारंभी मिशेल मार्श वगळता अन्य सर्वच फलंदाजांनी सपशेल निराशा केल्याने लखनऊच्या धावसंख्येवर बऱ्याच मर्यादा राहिल्या. मार्शने २८ चेंडूंत दोन चौकार आणि तीन षटकारांसह ३५ धावा केल्या. कर्णधार ऋषभ पंत सात धावांवर दुर्दैवी रितीने धावबाद झाला. तिसऱ्या षटकातील शेवटच्या चेंडूवर पंत धावचीत झाल्यानंतर लखनऊच्या पडझडीला सुरुवात झाली. मुकेशच्या गोलंदाजीवर मार्शने नॉन स्ट्रायकर एण्डवरील यष्टीच्या रोखाने स्ट्रेट ड्राईव्हचा उत्तम फटका खेळला होता, मात्र यावेळी चेंडू मुकेशच्या हाताला स्पर्शून यष्टीवर आदळला. ऋषभ पंत क्रीझपासून बराच दूर होता. अशा रीतीने बाद होत परतावे लागल्याने त्याला आपली निराशा लपवता आली नाही.

अनुभवी एडन मार्कराम (११), आयुष बदोनी (०), निकोलस पूरन (६) किरकोळ धावसंख्येवर बाद झाल्याने या संघाला सातत्याने धक्के बसत गेले. सहाव्या क्रमांकावर फलंदाजीवर उतरणाऱ्या अब्दुल समदने सर्वाधिक ३६ धावांसह डाव सावरण्याचा पुरेपूर प्रयत्न केला, मात्र प्रारंभी झालेल्या मोठ्या पडझडीमुळे त्याच्या प्रयत्नांवर बऱ्याच मर्यादा आल्या.

### सामन्यानंतर लखनऊच्या गोटात तणाव?

सामना संपल्यानंतर मैदानावर एक वेगळंच दृश्य पहायला मिळाले. लखनऊ सुपर जायंट्सचे मालक संजीव गोएंका, कर्णधार ऋषभ पंत आणि कोच जस्टिन लँगर यांच्यात मैदानावरच गंभीर चर्चा झाल्याचं दिसले. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये गोयंका काहीतरी बोलताना दिसतात, तर पंतही आपले मत मांडताना दिसतो. या चर्चेमुळे चाहत्यांमध्ये अनेक तर्क–वितर्क सुरू झाले आहेत.

# कोनेक्स प्रीमियर लीगमध्ये रेड चॅलेंजर्स संघ विजेता



**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील भेंडखळच्या श्री ठाणकेश्वर येथील भव्य मैदानावर कोनेक्स टर्मिनल कंपनीच्या व्यवस्थापकीय अधिकारी आणि कर्मचारी यांच्या वतीने आयोजित एकदिवसीय क्रिकेट स्पर्धा रंगली. खेळीमेळीच्या वातावरणात पार पडलेल्या या कोनेक्स प्रीमियर लीगमध्ये चार प्रमुख संघांनी सहभाग नोंदविला.

स्पर्धेचे उद्‍घाटन रवि प्रसाद यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सामन्यांमध्ये यलो वॉरियर्स (कर्णधार तेजस मानकामे), रेड चॅलेंजर्स (कर्णधार तुषार ठाकूर), व्हाईट वॉरियर्स (कर्णधार नटराज सालियन) आणि ब्ल्यू रॉयल्स (कर्णधार विनय तांडेल) यांनी रंगत आणली. स्पर्धेत कंपनीच्या स्टाफने सहभाग घेतला.

स्पर्धेत रेड चॅलेंजर्स संघाने विजेतेपद, तर व्हाईट स्ट्राईकर्स संघाने उपविजेतेपद पटकाविले. मालिकावीर श्री.पाटील (रेड चॅलेंजर्स), सामनावीर मयुर पाटील (रेड चॅलेंजर्स), नितीन वाघमारे (ब्ल्यू रॉयल्स), साहिल पाटील (ब्ल्यू रॉयल्स), ऋषिकेश सरवडे (व्हाइट स्ट्राईकर्स), तेजस म्हात्रे (रेड चॅलेंजर्स), उत्कृष्ट फलंदाज रोहित घरत (व्हाइट स्ट्राईकर्स), गोलंदाज साहिल पाटील (रेड चॅलेंजर्स), क्षेत्ररक्षक म्हणून भूषण म्हात्रे (रेड चॅलेंजर्स) यांना गौरविण्यात आले.

## भारतीय संघाच्या झिम्बाब्वे दौऱ्याचे वेळापत्रक जाहीर

**नवी दिल्ली** : भारतीय संघ यावर्षी जुलैमध्ये झिम्बाब्वेचा दौरा करणार असून यजमान संघाविरुद्ध तीन सामन्यांची टी–२० मालिका खेळेल. भारत आणि झिम्बाब्वे यांच्यात २३ ते २६ जुलैदरम्यान तीन सामन्यांची टी–२० मालिका खेळवली जाईल. तिन्ही सामने हरारे येथे खेळले जाणार आहेत.

भारतीय संघाचे बहुतेक क्रिकेटपटू सध्या आयपीएल २०२६मध्ये व्यस्त आहेत आणि त्यानंतरही त्यांना विश्रांतीसाठी वेळ मिळणार नाही. लीग संपल्यानंतर संघाला आंतरराष्ट्रीय मालिका खेळाव्या लागतील.

## ४० वर्षांनंतर इराकचा संघ फुटबॉल विश्वचषकासाठी पात्र

**मेक्सिको, रोम : वृत्तसंस्था**

एकीकडे मध्यपूर्वेतील युद्धजन्य परिस्थितीमुळे प्रचंड तणाव असताना मेक्सिकोमध्ये झालेल्या आंतरखंडीय प्ले–ऑफ सामन्यात इराकने बोलिव्हियावर २–१ असा अटीतटीचा विजय मिळवला. यासह तब्बल ४० वर्षांनंतर इराकचा संघ विश्वचषकासाठी पात्र ठरणारा ४८वा आणि शेवटचा संघ ठरला आहे.

बोलिव्हियाविरुद्धच्या सामन्यात अली अल–हामदी आणि आयमेन हुसेन यांनी केलेल्या गोलमुळे इराकने हा विजय साकारला. आता इराकचा संघ गट 'आय'मध्ये फ्रान्स, सेनेगाल आणि नॉर्वे विरुद्ध खेळणार आहे.

**इटली सलग तिसऱ्यांदा वर्ल्डकपबाहेर**

जागतिक फुटबॉलमधील महाशक्ती इटलीच्या अधोगतीचा नवा नीचांक पहायला मिळाला. युरोपियन प्ले–ऑफच्या अंतिम सामन्यात ६६व्या क्रमांकावरील बोजनिया आणि हर्झगोव्हिनाने चार वेळच्या विश्वविजेत्या इटलीला पेनल्टी शूटआऊटमध्ये ४–१ असे पराभूत केले. या पराभवामुळे इटलीचा संघ सलग तिसऱ्यांदा फिफा विश्वचषक स्पर्धेसाठी पात्र ठरू शकलेला नाही.

# आयसीसी क्रमवारीत भारताचे वर्चस्व

## अभिषेक-इशान अव्वल; हार्दिकची दुसऱ्या स्थानी झेप

**दुबई : प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) जाहीर केलेल्या ताज्या टी–२० क्रमवारीत भारतीय खेळाडूंनी आपले वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. फलंदाजीच्या क्रमवारीत अभिषेक शर्मा आणि इशान किशन यांनी आपली अव्वल स्थाने कायम राखली असून गोलंदाजी आणि अष्टपैलू खेळाडूंच्या श्रेणीतही भारतीयांचा दबदबा पहायला मिळत आहे.

टॉप १० टी–२० फलंदाजांच्या यादीत भारताच्या चार फलंदाजांनी स्थान पटकावले आहे. सलामीवीर अभिषेक शर्मा ८७५ रेटिंगसह पहिल्या क्रमांकावर, तर इशान किशन (८७१ रेटिंग) दुसऱ्या स्थानावर आहे. त्यांच्याव्यतिरिक्त तिलक वर्मा सहाव्या आणि भारताचा टी–२० कर्णधार सूर्यकुमार यादव सातव्या क्रमांकावर स्थिर आहेत.

गोलंदाजांच्या क्रमवारीत अफगाणिस्तानचा फिरकीपटू राशीद खान अव्वल स्थानी असला, तरी भारतीय गोलंदाजांनी त्याला तगडे आव्हान दिले आहे. भारताचा मिस्ट्री स्पिनर वरूण चक्रवर्ती दुसऱ्या क्रमांकावर पोहचला असून अनुभवी वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहने पाचवे स्थान पटकावले आहे.

अष्टपैलू खेळाडूंच्या यादीत झिम्बाब्वेचा कर्णधार सिकंदर रझा पहिल्या क्रमांकावर असून भारताचा हार्दिक पंड्या दुसऱ्या स्थानावर कायम आहे.

# कॅप क्लबच्या वर्धापन दिनानिमित्त क्रिकेट स्पर्धा रंगली






**पनवेल : वार्ताहर**

पनवेल येथील कॅप क्लबच्या आठव्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित भव्य बॉक्स क्रिकेट टूर्नामेंट मोठ्या उत्साहात पार पडली. या स्पर्धेत तमीम आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी उत्कृष्ट सांघिक खेळाचे प्रदर्शन करत विजेतेपद पटकाविले.

या क्रीडा महोत्सवाचे उद्‍घाटन आणि बक्षीस वितरण सोहळा पनवेलमधील विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून महापौर नितीन पाटील, जे.एम. म्हात्रे चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष प्रीतम म्हात्रे, नगरसेवक राजू सोनी, सुमित झुंजारराव उपस्थित होते.

सकाळपासून सुरू झालेल्या या स्पर्धेत अनेक संघांनी सहभाग नोंदवला होता. अंतिम फेरीत तमीम यांच्या संघाने बाजी मारली, तर हादी यांच्या संघाने उपविजेतेपद प्राप्त केले. संजू यांच्या संघाने तृतीय, तर प्राईम होम्स संघाने चतुर्थ स्थान मिळवले. सर्वच संघांनी शिस्तबद्ध आणि कौशल्यपूर्ण खेळाचे दर्शन घडवत उपस्थितांची मने जिंकली.

स्पर्धेत चमकदार कामगिरी करणाऱ्या वैयक्तिक खेळाडूंचाही यावेळी गौरव करण्यात आला. यामध्ये नाईम, कामरान, तरुण, विशाल कारंगुटकर, सईद, अयान आणि हेमंत परब यांना त्यांच्या उत्कृष्ट खेळासाठी ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले तसेच स्पर्धेदरम्यान लकी ड्रॉच्या विजेत्यांनाही आकर्षक बक्षिसे प्रदान करण्यात आली.

या इव्हेंटच्या यशस्वीतेसाठी आयोजक ॲड. मनोहर सचदेव आणि मनोज देढीया यांनी नियोजन केले होते. दैनंदिन तणावातून मुक्त होऊन खेळाडूंनी या स्पर्धेचा आनंद घ्यावा, हा या उपक्रमाचा मुख्य हेतू असल्याचे त्यांनी सांगितले. काजल देढीया यांच्यासह कॅप क्लबच्या सर्व सदस्यांनी उपक्रमासाठी परिश्रम घेतले.

## सौरव गांगुलीवर येणार बायोपिक!

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेटमधील दिग्गज खेळाडू आणि माजी कर्णधार सौरव गांगुली याच्या बायोपिकबाबत मोठी अपडेट समोर आली आहे. या बहुप्रतिक्षित चित्रपटाचे टायटल आता निश्चित झालं असून त्याचे नाव 'दादा' असे ठेवण्यात आले आहे. या चित्रपटात गांगुलीची भूमिका साकारणार आहे राजकुमार राव, जो आपल्या दमदार अभिनयासाठी ओळखला जातो.

राजकुमार राव यांनी सोशल मीडियावर या चित्रपटाच्या मुहूर्ताचे फोटो शेअर करत चाहत्यांना ही माहिती दिली. त्यांनी पोस्टमध्ये "आणि सुरुवात झाली... फक्त एकच दादा" असे लिहिले आहे. या चित्रपटाबाबत उत्सुकता वाढली आहे.









ज्ञानराज माझी योग्यांची माऊली।। जेणे निगमवल्ली प्रगट केली।।



विठ्ठल रुख्मीणी तुम्ही अखंड आणा ध्यानी।।



सर्व मंगल मांगल्ये। शिवेसर्वार्थ साधिके शरण्ये त्र्यंबकेगौरी। नारायणी नमोस्तुते।।



तुकाराम तुकाराम नाम घेता कापे यम।।


वर्ष २१ वे

**श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत**
**माऊली हरिपाठ मंडळ, गव्हाण-कोपर आयोजित**

वै. ह.भ.प. अप्पा माऊली (पनवेल) यांच्या कृपाशिर्वादाने
ह.भ.प. बानुबाई (खारकोपर) यांच्या उपस्थितीत.



## अखंड हरिनाम सप्ताह



**ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी सामुदायिक पारायण सोहळा**

व्यासपीठ चालक – ह.भ.प. शिवाजी महाराज पाटणकर (आळंदी–देवाची)

प्रारंभ: चैत्र शुद्ध १३, मंगळवार, दि. ३१/३/२०२६

देवीचा अभिषेक सकाळी ८.०० वाजता

सांगता: चैत्र कृ. ५, मंगळवार, दि. ७/४/२०२६

सर्व भाविकांना कळविण्यात आनंद होत आहे की, सालाबादप्रमाणे माऊली हरिपाठ मंडळ, गव्हाण तर्फे स्वा. सु.ह.भ.प. वै. सदानंद गुरुजी (देवाची आळंदी) यांचे परमशिष्य ह.भ.प. शिवाजी महाराज पाटणकर (देवाची आळंदी) यांच्या प्रेरणेने ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा चैत्र शुद्ध १३, मंगळवार दि. ३१/०३/२०२६ ते चैत्र कृ. ५ मंगळवार दि. ७/०४/२०२६ रोजी संपन्न होत आहे. तरी कृपया सर्व भाविकांनी ह्या पर्वणीचा लाभ घ्यावा, ही नम्र विनंती.

### दैनंदिन कार्यक्रम

पहाटे ४.०० ते ६.०० वा. - काकडा
सकाळी ८.०० ते १२.३० वा. - ज्ञानेश्वरी पारायण
सायं. ४.०० ते ५.०० वा. - प्रवचन
सायं. ६.०० ते ७.०० वा. - सामुदायिक हरिपाठ
रात्री ०७.३० ते ०९.३० वा. - कीर्तन

**शुक्रवार, दि. ०३/०४/२०२६**

प्रवचन - ह.भ.प. राजेंद्र गुरुजी (कुंडेगाव)
हरिपाठ - शिवशंभी हरिपाठ मंडळ, कुंडेगाव

किर्तनकार - ह.भ.प. विक्रम महाराज थोरवे (गणेगाव- कर्जत)
स्मरणार्थ - कै. शिवाजी गजानन पाटील
सौजन्य - सौ. ललिता सुनिल पाटील (खारकोपर)

**शनिवार, दि. ०४/०४/२०२६**

प्रवचन - ह.भ.प.अशोक महाराज (बामणडोंगरी)
हरिपाठ- जय हनुमान प्रासादिक हरिपाठ मंडळ, बामणडोंगरी

किर्तनकार - ह.भ.प. विक्रांत महाराज पोंडेकर (आळंदी-देवाची)
स्मरणार्थ - कै. गिताबाई त्रिंबक देशमुख
सौजन्य - श्री. विराज जयवंत देशमुख (गव्हाण)

**रविवार, दि. ०५/०४/२०२६**

प्रवचन - ह.भ.प. रोशन महाराज ठाकूर (बेलपाडा)
हरिपाठ - श्री कृष्ण हरिपाठ मंडळ, बेलपाडा

किर्तनकार - ह.भ.प. भगिरथ महाराज काळे (सिन्नर)
स्मरणार्थ - कै. शिवाजी रघुनाथ देशमुख
सौजन्य - श्री. किरण शिवाजी देशमुख (गव्हाण)

**सोमवार, दि. ०६/४/२०२६**

सकाळी ८.३० वा - ग्रंथराज ज्ञानेश्वरी पुजन
सायं ४ ते ५ वा - दिंडी सोहळा व दिपोत्सव सोहळा
सामुदायीक हरिपाठ

किर्तनकार - ह.भ.प. डॉ. चारुदत्त महाराज आफळे (पुणे)
स्मरणार्थ - कै. यमुना वसंतशेठ पाटील
सौजन्य - ह.भ.प. वसंतशेठ हरि पाटील (खारकोपर)

**काल्याचे कीर्तन:** मंगळवार, दि. ०७/०४/२०२६ रोजी सकाळी १० ते १२ वा. ह.भ.प. श्रावण महाराज अहिरे (नाशिक),
सौजन्य : श्री. महेंद्रशेठ तुकाराम घरत
किर्तनसाथ : पनवेल-उरण वारकरी सांप्रदाय

**ठिकाण - श्री शांतादेवी मंदीर, गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड**


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com